# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००७ |
| वर्ष | : | आठवे |
| अंक | : | ५ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |


**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ११६**


MAHMAR 19359/13/1/2000-TC

व्ही. पी. एम्.

# दिशा

विद्या प्रसारक मंडळ
ठाणे

वर्ष आठवे / अंक ५ / एप्रिल २००८



## संपादकीय

### चष्मे बदलावे लागतील

विभिन्न प्रक्रियांद्वारे कमीत कमी खर्चात आणि कमीत कमी वेळात दर्जेदार उत्पादन मिळावे या दृष्टीने जे प्रयत्न केले जातात, त्या प्रयत्नांना गुणवत्ता व्यवस्थापन म्हणतात. दर्जा ही संकल्पना व्यक्ती व कालसापेक्ष असल्याने दर्जा ठरविण्याचे आणि तपासण्याचे निकष हे बदलत असतात. यातूनच मानवी व्यवहारांना आकार येत जाऊन त्या व्यवहारातील सर्व गुणदोषांचा व्यवस्थापनावर परिणाम होत रहातो. कोणताही व्यवसाय वा कोणतीही संस्था यांतील व्यवस्थापन सकल गुणवत्ता परिपूर्ण व्हावे. ही सर्वसाधारण अपेक्षा असते. यालाच व्यवस्थापन शास्त्राच्या नव्या परिभाषेत 'सकल गुणवत्ता व्यवस्थापन' (Total Qucing Management) असे म्हटले जाते. ही सकल गुणवत्ता हे आदर्श ध्येय वा उद्दिष्ट असले तरी माणसांमधील व्यवहारातील राजकीय स्वरूपाच्या वृत्ती प्रवृत्ती, स्वार्थ प्रेरित दृष्टिकोन यामुळे ही संकल्पना केवळ काल्पनिकच ठरते.

व्यवस्थापन शास्त्रातील संकल्पना गेल्या ३०-४० वर्षात आमूलाग्र बदलत चालल्या आहेत. 'माणसांकडून काम करून घ्यायचे म्हणजेच व्यवस्थापन करायचे' हा हुकूमशाहीला वाव असणारा विचार, काळाच्या ओघात मागे पडला. एफ्. डब्लू. टेलरच्या व्याख्येतील नियोजन, संघटन, संचालन आणि नियंत्रण हे घटक आता महत्त्वाचे ठरत आहेत.त्यामुळे काम करून घेणे यापेक्षा उद्दिष्टपूर्ती हे ध्येय महत्त्वाचे ठरले.

व्यवस्थापन शास्त्रामधील हे बदल निश्चितच चांगले व स्वीकारार्ह आहेत. प्रत्यक्ष व्यवहारात मात्र अडचणी निर्माण होतात, त्या शिक्षण प्रक्रियेशी संबंधित असलेल्या घटकांमध्ये अभावानेच आढणाऱ्या समायोजनामुळे, समायोजनेत नसणाऱ्या गतिशीलतेमुळे आणि अपरिपक्व व्यवस्थापनामुळे. शिक्षण क्षेत्रातील व्यवस्थापनापुरताच आपण विचार केला तर, शिक्षण शास्त्रातील परिभाषेत व संकल्पनांतही होणारे लक्षणीय बदल आपल्याला लक्षात घ्यावे लागतात. हे बदल जागतिकीकरण आणि आर्थिक उदारीकरणाच्या प्रभावामुळे होत आहेत. 'विद्यार्थी, पालक व

(कव्हर पृष्ठ क्रमांक ३)

व्ही. पी. एम्.

# दिशा



वर्ष आठवे / अंक ५/ एप्रिल २००७

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ११ वे / अंक ९ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री अरविंदाचे तत्त्वज्ञान विषयक विवेचन (लेखांक पहिला) | श्री. शं.बा.मठ | ३ |
| २) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | १० |
| ३) | रामायण - एक चिरंतन संस्कार प्रतीक | श्री. नरेन्द्र नाडकर्णी | १७ |
| ४) | गीताविश्व धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे - स्वामी माधवानंद | श्रीमती आशा भिडे | २० |
| ५) | बचत : एक महत्त्वपूर्ण गरज - बचतीचे संस्कार | श्री. मोहन पाठक | २३ |
| ६) | "ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण" | श्री. श्रीनिवास आठल्ये | २७ |
| ७) | असे साजरे केले - अमृत महोत्सवी वर्ष | सौ. ललिता फिरके, सौ. कांचन मोहित, सौ. रश्मी धर्माधिकारी | २८ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | ३३ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# श्री अरविंदांचे तत्वज्ञान विषयक विवेचन

## (लेखांक पहिला)

*योगी अरविंद यांच्या तत्वज्ञानाचा पहिला भाग येथे देत आहोत - संपादक*

### सत्याचे सामान्य स्वरूप

श्री अरविंदांच्या मते अंतिम सच्चिानंद ब्रह्म असून ते विश्वाच्या मुळाशी आहे. ते सत् रूप असून अनेकतेमधून व्यक्त होत असते. त्याचे अस्तित्व अमर्याद व स्थल काळातील आहे. तसेच ते चिरंतन व अविनाशी आहे, ज्ञानरूप व आनंदमय आहे. एकाच वेळी ते साकार व निराकारही असते. ब्रह्माला स्वतःचा असा कोणताच आकार नसला तरी ते विविध आकारात अभिव्यक्त होत असते.

ब्रह्म हे निरपेक्ष असून ते द्वैतातीत, शब्दातीत व मर्यादातीत आहे. मानवी मनाच्या विशिष्ट मर्यादांमुळे त्याला ब्रह्माचे सत्य स्वरूप कळत नाही. ते स्वतंत्र व निरपेक्ष आहे. ते निरपेक्ष ब्रह्म एकाच वेळी अचल व चल (Being and becoimg) असून ही दोन्ही रूपे सारख्याच प्रकारे सत्य आहेत.ते ब्रह्म सर्व संबंधातीत, कालातीत व क्षेत्रफाळातीत आहे. एकत्व व अनेकत्व त्याच्या परस्पर पूरक बाजू आहेत. ब्रह्म अत्यल्प प्रमाणात अभिव्यक्त होते त्या अवस्थेला अवचेतन म्हणतात, संपूर्ण अभिव्यक्ती होते त्याला अतिचेतन अवस्था म्हणतात व या दोहोमधील अवस्था ही चेतन होय. ब्रह्माच्या एकतेत अनेकता अंतर्निहित असते.

ब्रह्मज्ञान मनाद्वारे होत नाही. श्रीअरविंदांच्या मते उच्च चेतनेची अनुभूती मनाद्वारे प्राप्त होवू शकत नाही. त्यासाठी मनाच्या कक्षा ओलांडणे आवश्यक आहे. भौतिक जगत् मिथ्या किंवा आभासात्मक नसून ते सत्याची निम्न श्रेणी आहे. अनेकता ब्रह्माचा अविभाज्य अंश आहे. जगतात मिथ्या असे काहीच नाही. अचेतनापासून अतिचेतनापर्यंत सर्व सत्याच्याच अवस्था आहेत. जड, जीव, प्राण, मन, अधिमानस, आणि अतिमानस, या आध्यात्मिक उत्क्रांतीच्या अवस्था आहेत. पुढील अवस्था पूर्वीच्या अवस्थेपेक्षा सत्याची जास्त अभिव्यक्ती करीत असते. अति मानस ही सत्याची उच्चतम श्रेणी असून तिला ब्रह्माची जाणीव किंवा सत्य चेतना म्हणतात. पूर्णतः असत्य अशी कोणतीच अवस्था नसते. जगत् सुद्धा या सत्याचीच अभिव्यक्ती असल्यामुळे ते असत्य नाही. जीव, जगत् ईश्वर ब्रह्माचे चिरंतन, अंगभूत, अविभाज्य अंश आहेत.

ब्रह्म म्हणजे सच्चिदानंद सत्-चित्-आनंद ही त्रयी आहे. या तीनही बाजू अन्योन्य सापेक्ष, पूरक आश्रयी आहेत. सान्त आणि अनन्त, एक आणि अनेक, हे ब्रह्माच्या ठिकाणी एकत्र केलेले अंगभूत घटक आहेत. जीव, जगत् ईश्वर ही एकत्र आलेली भिन्न सत्ये नसून त्यांची एकात्मता मूलभूत आहे. सत्याच्या उत्क्रांतीचा क्रम श्रीअरविंद अशा प्रकारे स्पष्ट करतात. सत्-जडावस्था (Matter)चित्-प्राण (Life) आनंद-चित् Psyche अतिमानस-मन (Mind) या क्रमाला श्रीअरविंदाच्या तत्त्वज्ञानात महत्त्वाचे स्थान आहे.

ब्रह्म हे सत् चित् आनंद आणि अतिमानस यांच्या माध्यमातूनच विश्वामध्ये प्रकट होत असते. उत्क्रांती जडावस्थेतून प्राण, चित्मन आणि अंतिमतः अतिमानसा द्वारे ब्रह्म प्रतीतीकडे ज्ञात असते. अतिमानस व मन जेथे एकत्रित येतात तो आरोहण, अवरोहणाचा मध्य बिंदू असतो. त्यामधील पटल दूर होणे, पृथ्वीवर दिव्य जीवन प्रस्थापित होण्यासाठी आवश्यक असते. त्यामुळेच

अतिमानसतत्व आपल्या मर्यादांचा त्याग करून अतिमानस चेतनेत संपूर्ण शक्तीनिशी पृथ्वीवर अवतरित होईल.

ब्रह्म प्रतीती म्हणजे निर्वाण नव्हे. निर्वाणावस्था अभावात्मक, चेतनाशून्य असून अशा अवस्थेत सर्वजगत् लोप पावल्याचा, अमर्याद चिर शांतता प्रस्थापित झाल्याचा अनुभव येतो. पण हा खरा श्रेष्ठ आध्यात्मिक अनुभव नव्हे. निर्गुण, निराकार, असे ब्रह्म ही केवळ बौद्धिक कल्पना नाही. ब्रह्माचे वर्णन नेति असे करण्यात येत असले तरी ते शून्यरूप नसुन त्याचे स्वरूप निश्चित करण्यास शब्द असमर्थ ठरतात हे आहे.

ब्रह्म आणि अतिमानस यात फरक आहे. ब्रह्म सर्व अभिव्यक्तीचा मूलाधार असून सच्चिदानंद रूप आहे, तर अतिमानस ब्रह्माची सत्य चेतना असून एकाच वेळी विश्वात्मक व विश्वातीत असते.

स्वतःच्या व इतर योग पध्दतीतील फरक करताना श्रीअरविंद म्हणतात - इतर योग पद्धतींचा उद्देश सच्चिदानंदाशी स्थिर एकात्मता साध्य करणे किंवा त्यामध्ये विलीन होणे हा राहिलेला आहे. त्यांच्या मते प्राचीन भारतीय पद्धती एकांगी किंवा अपूर्ण आहेत. त्यांच्या योग मार्गाचा उद्देश मात्र केवळ ब्रह्म साक्षात्कार नसून त्या ब्रह्मचेतनेची सत्याच्या कनिष्ठ श्रेणींमध्ये प्रस्थापना करणे हा राहिलेला आहे. त्यामुळे कनिष्ठ श्रेणीचे उन्नयन श्रेष्ठ आध्यात्मिक चेतनेमध्ये होऊ शकेल. यासाठी आदि शक्तीच्या कृपेचे महत्त्व लक्षात ठेवणे आवश्यक आहे. ब्रह्माची शक्ती म्हणजेच आदिशक्ती हीच श्रेष्ठतम शक्ती होय.

### माया

जगताला मिथ्या, असत्य या अर्थाने मानणाऱ्या सिध्दांताशी श्रीअरविंद सहमत नाहीत. त्यांच्या मते जगत् सत्य असून ते ब्रह्माचीच अभिव्यक्ती आहे. मायेला अनिर्वचनीय म्हणणे तसेच जगताला असत्य मानणे त्यांना मान्य नाही. मात्र मिथ्यावादी वेदान्ताचे ब्रह्म हे अंतिम सत्य आहे व जगता विषयीचा आपला दृष्टिकोन अज्ञान जन्य आहे हे दोनही सिद्धांत श्रीअरविंद मान्य करतात. याचा अर्थ मायावाद ते पूर्णतः नाकारतात असे नाही, ते मिथ्यात्व मान्य करतात. ते ब्रह्म व जगत यामध्ये भेद मानतात. परंतु ब्रह्म स्वभावापासून जगताची उत्पत्ती होते हे ते मान्य करीत नाहीत. त्यांनी आत्मा आणि जगत् यामध्ये सुद्धा फरक केलेला आहे. त्यांच्या मते माया ही त्या ब्रह्माची सर्व श्रेष्ठ चेतना शक्ती आहे. ती सर्व बंधनातील आहे. ती अनेकत्वाचा आधार असून त्यांच्या द्वारे अभिव्यक्त होत असते. ती एकाचवेळी जीव, जगत् ईश्वररूप असते; ती मिथ्याही नाही अनिर्वचनीयही नाही.

### जगताचे स्वरूप

विश्व हे अमर्याद व अनेक आहे. त्यामध्ये आढळणारी विविधता ब्रह्माचीच अभिव्यक्ती असते. ब्रह्मच उत्क्रांतीच्या विविध स्तरातून अभिव्यक्त होत असते. चेतना ही उत्क्रांतीची निर्मिती नसून तिचा आकार आहे. आत्मसाक्षात्कारामुळे जगत् नष्ट होत नाही. त्याचे सत्यत्व कायमच राहाते. उलट मुक्तात्म्याला जगताचा अर्थ जास्त स्पष्ट व सुसंगत रितीने कळतो. जगत् हे ब्रह्माची अभिव्यक्ती असल्यामुळे सत्यच आहे. जीव क्षेत्रज्ञ असून जगत् हे त्याचे क्षेत्र आहे. ते परस्पर साहायक आणि एकमेकांच्या उन्नतीला आवश्यक आहेत. अहंकार हा विकास मार्गातील एक अडसर आहे. हा अडसर दूर झाल्यास एकात्म ज्ञान प्रकट होण्यास मदत होते.

### अवकाश आणि काळ (space and time)

श्रीअरविंदांच्या मते अवकाश आणि काळ यांना स्वतंत्र अस्तित्व नाही. वस्तुतः अवकाश आणि काळ नष्ट होतात. मनाच्या मर्यादित अवस्थेतच ते सत्य आहे, असे वाटत असते. घटनाक्रमाद्वारे काळ आणि द्रव्याच्या अविभाज्यतेमुळे अवकाशाचा बोध होतो. अतिमानस

अवस्थेमध्ये विभाजनाला स्थान नसल्यामुळे त्या अवस्थेत काळ आणि अवकाशातील स्थान उरत नाही. ते तेथे एकरूपावस्थेत असतात. सत्य काळ अवकाशातीत आहे. चेतनेच्या प्रत्येक अवस्थेत भिन्न भिन्न काळ व अवकाश असतात. देशकाळाद्वारेच ब्रह्माची अनेकविध अभिव्यक्ती होत असते. परंतु सूक्ष्म आध्यात्मिक अनुभवामध्ये मात्र त्यांना कोणतेही स्थान नसते. श्रीअरविंदांनी इथे स्वप्नाचा दाखला दिलेला आहे. अनेक वर्षाचा कालावधी काही क्षणात व्यतीत होतो असा आपला अनुभव आहे. म्हणजेच एकाच चेतनेत भिन्न अवस्थेत भिन्न काळाचे अस्तित्व राहू शकते.

श्रीअरविंदांच्या मते जीव चिरंतन सत्याचे शक्तिरूप असून त्याचा मूळ उद्देश आत्मविकास हा आहे. जीव हा जगत् विरोधी नाही. जगत् सापेक्ष आहे. इतकेच नव्हे तर जगताचा अंगभूत घटक आहे. जीव जगताप्रमाणे चिरंतन असून ते दोन्ही ईश्वराचे अंगभूत आहेत. ब्रह्माची क्रियात्मक बाजू म्हणजे ईश्वर होय. जीव, जगत् ईश्वर हे ब्रह्माचे चिरंतन अंश आहेत. श्रीअरविंदानी अंतरात्म्याला आध्यात्मिक जीव अशी संज्ञा दिली आहे. त्याच्या ठिकाणी एकाचवेळी समष्टी व व्रष्टी भावाचे केंद्र राहात असते. आत्मविकासासाठी याची जाणीव होणे आवश्यक आहे. जीव म्हणजे अहंकार नव्हे तर सर्व प्रकारचे व्यक्तिरूप भाव व मर्यादा यांच्या अतीत असणारे तत्त्व होय. तो एकाचवेळी जगत् रूप व्यक्तिरूप, ईश्वररूप सुद्धा आहे.

ब्रह्म जरी एक असले तरी त्याच्या अभिव्यक्ती अनेक आहेत. जीव ब्रह्मापासूनच अभिव्यक्त होत असतो व अज्ञानाचा विनाश झाल्यानंतर ब्रह्माची असणाऱ्या त्याच्या अंगभूत तादात्म्याची अनुभूती त्याला होत असते. अहंकार नाहीसा करणे आध्यात्मिक जीवनातील प्राथमिक आवश्यकता असते. त्याशिवाय अज्ञानाचा निरास होत नाही. श्रीअरविंद विवेचनात चैत्य पुरुषाचे ( Psychic Being) स्थान महत्त्वाचे आहे. चैत्य पुरुष म्हणजे अतिमानस अवस्थेशी प्रत्यक्ष संपर्क असणारे तत्त्व अशी त्याची व्याख्या करता येत नाही. मानवी चेतना व अतिमानसचेतना यामध्ये संपर्क प्रस्थापित झाला तर चैत्य पुरुषाचा प्रतिसाद द्रुतगतीने मिळतो. चैत्य पुरुष जागृत असले अतिमानसिक अवस्थेचा मुख्य आधार असेल तरच अतिमानसिक परिवर्तन शक्य होईल.

चैत्य पुरुष व वासनामय जीव यामध्ये फरक आहे. वासनामय जीवाचा उद्देश सान्त सुख मिळविण्याचा राहातो तर चैत्य पुरुष दिव्य जीवनोत्मुख असतो. वासनामय जीवाचा बाह्य कवच तर चैत्य पुरुष अंतर्यामी असतो. चैत्य मन (Pscyhic Mind) आणि आध्यात्मिक मन यामध्ये फरक आहे. मन जेव्हा सत्योन्मुख असते तेव्हा त्याला आध्यात्मिक मन असे म्हणतात. जेव्हा ते आत्मानुभूती व दिव्यज्ञानमय असते, तसेच विकासातीत असते तेव्हा त्याला आध्यात्मिक मन असे म्हणतात.

**अतिमानस**(Super Mind)

अतिमानससतत्त्व ही सर्वश्रेष्ठ आध्यात्मिक चेतना आहे. मन आणि अतिमानस यामधील प्रमुखचे अधिमानस (over mind) अशी संज्ञा आहे. अतिमानसाचे स्वरूप स्पष्ट करताना, श्रीअरविंद म्हणतात, अतिमानस म्हणजे सर्वव्यापी ब्रह्माची अभिव्यक्ती. ते ब्रह्माचे प्रतिनिधिकरूप असते. सच्चिदानंद आणि जगत् यांमधील तो दुवा आहे. त्यालाच ब्रह्माची सत्यचेतना असेही म्हणतात. ब्रह्म सर्वांच्या ठिकाणी आहे. सर्व वस्तू ब्रह्माच्या ठिकाणी आहेत आणि सर्व वस्तू ब्रह्म आहेत. या तीन विधानां द्वारे अतिमानसाचे त्रिविध स्वरूप स्पष्ट होते. ब्रह्माची आत्मजागृती म्हणजे अतिमानस.त्यालाच ईश्वर म्हणतात. स्थिर ब्रह्माचे क्रियात्मक अंग. त्यालाच आदिशक्ती असे म्हणतात. वेदांमध्ये सत्यचेतनेचा जो उद्देश्य आहे तो अतिमानसासंबंधी आहे असे श्रीअरविंद म्हणतात, परंतु वैदिक ऋषींनी सत्यचेतनेचे पृथ्वीवर कधीही अवतरण केले

नाही. यामुळे भारतातील आध्यात्मिक प्रयत्नांची परिणती मायावादात झालेली दिसून येत. अतिमानसाचे पृथ्वीवरील जड चेतनमध्ये अवतरण होऊन ते स्थिर झाल्याशिवाय पृथ्वीवर दिव्य जीवनाची प्रस्थापना होणे अशक्य आहे. असा त्यांचा दृष्टिकोन आहे. अतिमानसात सच्चिदानंद अंतर्हित असूनही त्याच्या अतीत आहे. त्यांचा पूर्ण योग भारतातील विभिन्न योग प्रणालीपेक्षा वेगळा व त्याचा समन्वय साधणारा आहे असे त्यांचे मत आहे.

### श्रीअरविंदाचा योग विषयक दृष्टिकोन-

स्वतःचा पूर्ण योग व इतर भारतीय योग सिद्धांत यातील फरक सांगताना श्रीअरविंद म्हणतात भारतीय योग प्रणालीत ईश्वर, शक्ती, जीव किंवा सच्चिदानंद माया आणि जीव ही प्रमुख आधारभूत तत्त्वे आढळतात. परंतु पूर्ण योगामध्ये त्याना गृहीतच धरण्यात येते व चेतनेचे भिन्न स्तर या दृष्टीने सच्चिदानंद अधिमानस व अतिमानस या त्रयीचे स्थान मान्य करण्यात येते. अधिमानसच्या माध्यमातूनच अतिमानस प्राप्त होऊ शकते व ती अवस्था प्राप्त झाल्यावर श्रेष्ठ अशा सच्चिदानंदाचा बोध होतो. या चेतनामध्ये व्यवधान (gap) नाही. कनिष्ठ आणि उच्चतम चेतनेमध्ये क्रमबद्धता आहे, यावरून हे स्पष्ट होईल की अतिमानस म्हणजे सच्चिदानंद नसून त्याची सत्यचेतना किंवा जगत् जागृतीची शक्ती आहे. अतिमानस अवस्था प्राप्त झाल्याशिवाय सच्चिदानंदाचा बोध होत नाही.

बौद्धिक चर्चेद्वारे अतिमानसाचे ज्ञान होत नाही. ते बुद्धीच्या अतीत आहे. केवळ स्वतःच्या प्रयत्नांच्या आधारावर त्याची प्राप्ती होणे शक्य नाही, आदिशक्तीची कृपा होणे त्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याची प्राप्ती हेच श्रीअरविंदाचे ध्येय होत.

अतिमानस मन प्राण व जड यांच्या अतीत असले तरी सर्व प्रकारच्या अभिव्यक्तींच्या मात्र ते अतीत नसते. ते सर्वव्यापी व ज्ञानमय आहे. अतिमानसाची प्राप्ती आध्यात्मिक सर्वश्रेष्ठ उपलब्धी असून ती ज्ञान आनंद व प्रेम यांचा स्रोत आहे.

### अधिमानस (Over Mind)

अतिमानसाप्रमाणे अधिमानस ही श्रीअरविंद तत्त्वज्ञानातील विशिष्ट संज्ञा आहे. अधिमानस श्रेष्ठ आणि कनिष्ठ चेतनेच्या दरम्यान राहात असते. ती त्रयीपैकी एक आहे. (सच्चिदानंद, अधिमानस व अतिमानस) अतिमानसाच्या प्राप्तीसाठी अधिमानसाची पूर्व प्राप्ती आवश्यक आहे. प्राचीन तत्त्वज्ञ अधिमानसाला श्रेष्ठतम तत्त्व समजले. त्यामुळे त्यापलीकडील अतिमानसाचा शोध त्यांनी घेतला नाही, मात्र मायावादाचा आश्रय घेतला. मन विभाजनात्मक ज्ञानरूप असून अतिमानस अविभाज्य ज्ञानस्वरूप आहे आणि अधिमानसाच्या ठिकाणी विभाजनातील एकता आढळून येते. श्रीअरविंदानी अधिमानसाची तुलना ईशावास्य उपनिषदातील हिरण्मयेन पात्रेण सत्यस्य अपि हितं मुखम्' या अवतरणाशी केलेली आहे. अतिमानसाच्या ठिकाणी शुद्ध एकात्मतेचा भाव असतो.तर चेतनेच्या निम्न स्तरावर एकात्मता विरहित अनेकात्मतेची जाणीव राहात असते. अधिमानस चेतनेत एकात्मता व अनेकात्मता हे दोन्ही भाव असतात. अधिमानसाची प्राप्ती हे स्पर्धकाचे ध्येय नव्हे. अतिमानसाच्या अवतरणा द्वारे जडाचे संपूर्ण परिवर्तन करणे हे त्याचे साध्य असावे.

### मन

मन भेदात्मक व व्यक्तिवाचक असून ते भौतिक चेतना स्वरूप असते. या चेतनेच्या अतीत होणे मोक्ष प्राप्तीसाठी आवश्यक आहे. श्रीअरविंदांनी काही ठिकाणी मनाला अतिमानसाची दुय्यम शक्ती असे म्हटले आहे. काही ठिकाणी अतिमानसाला मनापेक्षा अगर आध्यात्मिक मनापेक्षा मूलतः भिन्न मानलेले आहे. मन हे विश्लेषण आणि समन्वयाचे साधन आहे. परंतु आध्यात्मिक ज्ञानाचे

साधन नाही. ते संघर्ष व गोंधळ असणाऱ्या बुद्धीवर आधारलेले सत्याला स्वतःच्या विसंगत, अपूर्ण साच्यात बसविणारे असते. त्यामुळे सत्याचे योग्य ज्ञान होण्याला अडचणी निर्माण होतात व त्याची दिशाभूल होते. मन व प्राण यातील भेद स्पष्ट करताना श्रीअरविंद म्हणतात- मन हे सर्वव्यापी अतिमानसाची अंतिम व्यक्तिवाचक प्रक्रिया आहे. प्राण ही अतिमानसाच्या माध्यमातून समष्टीरूपामुळे व्यक्ती व त्याच्या कृती यावर निर्बंध ठेवीत असतो. मन मात्र व्यष्टीरूप आहे. तसेच मर्यादित आहे. मनाचे हे स्वरूप अतिमानसापेक्षा गुणात्मकरीत्या भिन्न असूनही ते अतिमानसाचेच अंतिम कार्यरत व्यक्तिरूप असते.

**सद्बुद्धी** (Real Idea)

सद्बुद्धी म्हणजे सत्य चेतना (Truth conseiousness). ती ब्रह्माची शक्ती असून अनेक, रूपांद्वारे अभिव्यक्त होत असते. सद्बुध्दी ही ब्रह्माचे बीजरूप आहे. तिच्याद्वारे अव्यक्त व्यक्त होत असते. जीवाच्या सर्व क्रिया व प्रतिक्रिया सद्बुद्धीच्या माध्यमातून होत असतात. तीच ब्रह्माची निर्माण शक्ती किंवा सत्य चेतना होय.तिलाच अतिमानस असेही म्हणतात. तिलाच सत्यप्रकाश (Light and reality) किंवा सत्याची आत्म प्रतीती (self awareness) असेही म्हणतात. देशकाळामध्ये अभिव्यक्त होण्यासाठी अतिमानस 'सत्य चेतना' किंवा 'सद्बुद्धीचे रूप' धारण करते असे श्रीअरविंद म्हणतात.

**ईश्वर -**

ईश्वर सर्वव्यापी, सर्वज्ञ व सर्वशक्तिमान आहे. विश्वातील सर्व घटक त्याच्याच शक्तीमुळे व्यक्त होतात. सर्वांचे निवास त्याच्या ठिकाणी असते. तो सर्व शक्तीचे उगमस्थान आहे. तो विश्वातीत व विश्वांतर्गत आहे. त्यालाच ब्रह्म असेही म्हणतात. तो अमर्याद अनंत सत् रूप आहे. अनेक रूपात असूनही त्यांनी तो बद्ध होत नाही. तो स्वयंपूर्ण व स्वतः सिद्ध आहे. आनंद सौंदर्य व दिव्यरूप आहे. सर्वांचा रक्षणकर्ता व आधार आहे. ब्रह्म आणि ईश्वर भिन्न नाहीत. सगुण ब्रह्म म्हणजेच ईश्वर तो निर्गुणाहून मूलतः भिन्न नाही. ब्रह्मचे क्रियात्मक रूप (Dynamic aspect) म्हणजेच ईश्वर. ईश्वर म्हणजेच अतिमानस, आदिशक्ती ईश्वराची शक्ती आहे. जीव आणि जगत् त्याचेच अंगभूत अंश होत.

ईश्वराचे ज्ञान बुद्धिद्वारे, धर्माद्वारे होऊ शकत नाही, धर्माचे अधिष्ठान बुद्धी राहू शकत नाही. बुद्धी निष्ठ धर्मामध्ये भावनेची सखोलतला आणि आध्यात्मिक वैशिष्ट्ये राहणार नाहीत. ईश्वराचा साक्षात्कार अनुभूतीने होतो. त्यासाठी बौद्धिक चेतनेच्या आश्रित जाणे आवश्यक. दृढ इच्छा, पावित्र्य अनुभूती त्यासाठी अपरिहार्य आहे. आध्यात्मिक मार्गात बुद्धीचे स्थान दुय्यम आहे. कारण ती सावळा गोंधळात घालते अर्ध सत्य व भ्रमात्मक युक्तिवादात गुंतविते व उन्नतीला बाधक ठरते. म्हणून श्रीअरविंद साधकाकडून संपूर्ण शरणागतीची अपेक्षा करतात. संपूर्ण शरणागती व निष्काम समर्पणभाव अत्यावश्यक आहे. वासनाशुद्धी शिवाय संपूर्ण शरणागती शक्य नाही. म्हणून साधकाने वासनाशुद्धी, संपूर्ण शरणागती व तसेच आत्मसमर्पणाची कास धरणे आवश्यक आहे.

ज्ञान प्रक्रियेत ज्ञाता आणि ज्ञेय याना वेगळे करता येत नाही. अहंकारामुळे निर्माण झालेल्या मर्यादित चेतनेकडून ज्ञानाचे खरे एकात्म स्वरूप लक्षात येत नाही. सर्व अनुभवाचे मूळ एकात्म ज्ञानात आहे. त्याची जाणीव नसल्याने आपण ज्ञाता ज्ञेय हा भिन्न आहेत असे समजतो. परिणामतः स्वानुभवाच्या खऱ्या स्वरूपाचे ज्ञान आपल्याला होत नाही. अप्रत्यक्ष ज्ञानाऐवजी एकात्मतेच्या जाणिवेमुळे प्राप्त होणारे प्रत्यक्ष ज्ञान हेच खरे ज्ञान असते. भारतीय वेदांत याच शक्यतेवर आधारित आहे. सर्वच ज्ञानमय आहे. अज्ञान भावात्मक नाही. अज्ञान म्हणजे अपूर्ण ज्ञान व अपूर्ण सत्य होय, अज्ञान हा ज्ञानाचा विनाश नव्हे; ते मर्यादित ज्ञान

असते, अज्ञान हेच सर्व दुःखाचे मूळ आहे. ज्ञानाची मर्यादा हीच अज्ञानाची उत्पत्ती स्वतःच्या एकात्मतेची, सत्य स्वरूपाची चेतना होणे हे अज्ञानाचे लक्षण आहे. त्यामुळे आपण स्वतःला विसरतो. व बाह्य चेतनेमध्ये राहतो.

श्रीअरविंदानी अज्ञानाचे सात प्रकार मानले आहेत.

१. मूलभूत अज्ञान (Original Ignorance)

२. वैश्विक अज्ञान (Cosmic Ignorance)

३. अहंकारात्मक अज्ञान (Egoistic Ignorance)

४. कालात्मक अज्ञान (Termproal Ignorance)

५. मानसशास्त्रीय अज्ञान (Psychological Ignorance)

६. स्वभावजन्य अज्ञान (Constitutional Ignorance)

७. व्यावहारिक अज्ञान (Practical Ignorance)

१. अपूर्ण सत्याला पूर्ण सत्य समजणे - मूलभूत अज्ञान,

२. देशकाळातील सत्याला देश कालांतर्गत समजणे -वैश्विक अज्ञान.

३. अहंकारवश होऊन मूलभूत एकात्मतेचा विसर पडणे - अहंकारात्मक अज्ञान

४. काळातीत असूनसुद्धा काळ सापेक्ष समजणे - हे कालात्मक अज्ञान.

५. स्वतःच्या अमर्याद श्रेष्ठ आध्यत्मिक स्वरूपाचा विसर पडून मर्यादित अनुभवाला परिपूर्ण समजणे- मानस शास्त्रीय अज्ञान.

६. स्वतःचे शरीरमन प्राण यानाच अंतिमतः सत्य मानणे व आत्म्याचा विसर पडणे हे - स्वभावजन्य अज्ञान

७. जगातील मूलभूत आध्यात्मिक आनंदाला मुकणे स्वतःच्या सुख दुःख वासना यातच मग्न राहणे - व्यावहारिक अज्ञान.

हे ज्ञान बौद्धिक ज्ञान नसून आध्यत्मिक उत्क्रांतीच्या परिणत अवस्थेत प्राप्त होणारी संपूर्ण ज्ञानावस्था होय.

### मोक्ष

मोक्ष म्हणजे सत्याची अनुभूती. श्रीअरविंदांचा उद्देश सुद्धा मोक्ष प्राप्ती हाच आहे. मोक्ष म्हणजे निरपेक्ष व्यक्तिरूपता (Exlusive individuality) नव्हे, त्याच्या अतीत होणे आवश्यक आहे. समष्टीरूप होणे याचा अर्थ अनंतता प्राप्त करणे. मोक्ष मिळविणे हे आपल्या इच्छेवर अवलंबून नाही आपली इच्छा नसली तरी कालौघात त्याची प्राप्ती अपरिहार्य आहे. मनवाचा सुसंवादी व परिपूर्ण विकास होणे मोक्षासाठी अपरिहार्य (indespensible) आहे. मोक्ष सहज प्राप्त होणे शक्य आहे असे मानू नये. भौतिक व इतर अज्ञानातून सुटणे, कठोर ध्येयदृष्टी, मोह निवृत्ती, संपूर्ण शरणागती साधकाच्या ठिकाणी असावयास हवी. मोक्ष ही प्रत्यक्ष अनुभूती आहे. तिच्या प्राप्तीनंतर सर्व प्रश्न आपोआप सुटतात.

### स्वातंत्र्य आणि नियतीवाद.

मानवाला भिन्न पर्यायून निवड करण्याचे स्वातंत्र्य आहे. मनुष्य परिस्थितीचा दास न होता ती तो बदलवू शकतो. स्वातंत्र्य सुद्धा समष्टीरूप ईश्वरी संकल्पाचे एक रूप आहे. ही जाणीव नसल्यास आपण वासनांचे दास होतो. कारण ह्या निवडीचे पण स्वातंत्र्य आहे. अध्यात्म मार्गात बुद्धीपेक्षा भावनेचे स्थान महत्वाचे आहे. समर्पण देखील स्वेच्छेने व्हावयास पाहिजे. नियतिवाद म्हणजे दैव श्रीअरविंदांनी स्वातंत्र्य आणि नियतिवाद यात समन्वय

साधण्याचा प्रयत्न केलेला आहे . तरी आदिशक्तीची कृपा मोक्ष प्राप्तीसाठी आवश्यक, भौतिक स्तरावर स्वातंत्र्याचे महत्त्व मान्य करण्यात येत असले तरी अध्यात्म मार्गात हक्काचे विशेष स्थान दिसत नाही. संपूर्ण शरणागतांवरच भर दिसतो.

बुद्धिद्वारे अनेक महत्त्वाचे व आश्चर्यकारक शोध लागलेले आहेत. परंतु सत्याचे ज्ञान देण्यास ती असमर्थ आहे. बुद्धी ज्ञानाचे श्रेष्ठतम साधन नव्हे. अध्यात्म मार्गात केवळ बौद्धिक स्वरूप न राहता तिला साक्षात्कारात्मक होणे आवश्यक. बुद्धीच्या साहायाला मर्यादा आहेत. बुद्धीचे सर्वात महत्त्वाचे कार्य - ती स्वतः सत्याधिष्ठित नसली तरी सत्याचे स्वरूप मनाच्या आवाक्यात आणणाच्या क्रियेत मदत करते. त्या चेतनेमध्ये परिवर्तन घडवून आणणे हाच सत्य ज्ञान होण्याचा मार्ग आहे. भौतिक स्तर जितका सत्य वाटतो किंबहुना त्यापेक्षा जास्त आध्यात्मिक स्तर सत्य व प्रत्यक्ष असतो. इथे तर्क उपयोगी नाही. मर्यादाबद्ध बुद्धी वा मन यांना याचे ज्ञान होऊ शकत नाही. याला कारण दिव्य चेतनेचा अभाव हे आहे. हा अभाव दूर झाल्यानंतर सत्य स्वयमेव प्रकाशित होईल व साऱ्या तर्क विसंगती दूर होतील.

- श्री. शं.बा.मठ
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३ २०३०

**दिशा**

**वर्गणीसाठी संपर्क:**
**डॉ. बेडेकर विद्यामंदिर,**
**नौपाडा, ठाणे.**
**दूरध्वनी २५४२६२७०**

## सस्नेह नमस्कार

प्रिय प्रा. मोहन पाठक यांना,

सस्नेह नमस्कार,

आपण नियमितपणे 'दिशा' चा अंक पाठवीत आहात, तो मिळतो. अंक अतिशय वाचनीय व संग्राह्य असतो. विविध माहितीने परिपूर्ण मासिक एखाद्या शैक्षणिक संस्थेने प्रकाशित करणे ही खरोखरच कौतुकास्पद गोष्ट आहे. कारण, छपाई खर्च वाढला आहे की, आपण तो कशा प्रकारे भागवता हे माझ्या सारख्या शैक्षणिक संस्थेचा पदाधिकारी म्हणून काम पहात असणाऱ्याला विचार करण्यासारखी बाब वाटते.

आपली संस्था इतर शैक्षणिक संस्थेपेक्षा निश्चित एक आगळी वेगळी आहे कारण लाखो रूपयांचा नव्हे तर करोडो रूपयांचा व्यवहार करणाऱ्या अनेक संस्था आपल्या महाराष्ट्रांत आहेत पण; असे वैचारिक स्वरूपाचे मासिक ते प्रकाशित करीत असल्याचे माझ्या तरी पहाण्यात नाही.

आपल्या सारख्या अनुभवी व साहित्याची व सामाजिक, शैक्षणिक क्षेत्राची जाण असणाऱ्या व्यक्तीच्या हाती संपादकपदाची जबाबदारी संस्थेने सोपाविली आहे हे पाहून आनंद वाटतो व संस्थेने योग्य व्यक्तीची निवड केल्याबद्दल धन्यता वाटते.

कार्यबाहुल्यामुळे आपण आपणास यापूर्वी माझ्या भावना कळवू शकलो नाही याबद्दल क्षमस्व!


**अशोक ठाकूर**
**कार्याध्यक्ष**
सोनोपंत दांडेकर महाविद्यालय,
पालघर, जि. ठाणे - ४०१ ४०४
दूरध्वनी (९५२५२५) २५२११६३

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*माणूस म्हणजे माणसाचे आता दिसते ते रूप की आणखी काही?* वैदिक ज्ञान, आधुनिक विज्ञान यांचा संदर्भात घेतलेला हा शोध-संपादक

**नेकर क्युब**

'नेकर क्युब' (Necker Cube) मध्ये A नावाचा जो चौकोन दाखविला आहे, तो म्हणजे तुमची रहाण्याची फ्लॅट मधील खोली समजा (चित्र नं. १)




चित्र नं. १

हे चित्र एक प्रसिद्ध 'भ्रम चित्र' आहे. 'A' अक्षर दिसते ती समोरील भिंत आहे. पण खालच्या चित्रात 'B', ही भिंत पाठीमागची आहे. पण, पुन्हा जरा नीट प्रयत्न करा. 'B' ही भिंत निराळ्याच पद्धतीने 'पृष्ठभागावर' आलेली दिसेल. मग ह्या दृष्टिभ्रमाचे इंगित काय?

"Honest Perceptions of Two irreconcilable Realities" म्हणजे "प्रामाणिकपणे दिसणाऱ्या दोन सत्यदर्शनातील अपरिवर्तनीयता" हे शीर्षक आहे.

एकदा ह्या दोन्ही सत्यांची दर्शने 'Consciousness' ला झाली की पुन्हा पहिल्या 'A' च्या दर्शनाच्या बांधलकीतून मुक्तता होते व 'C' ह्या तटस्थ किंवा 'सम्यग्' पातळीवर दोन्ही सत्यांचे निर्विकार, असंघर्षमय दर्शन प्राप्त होते.

या जगाचे जे 'पशुवत दर्शन' आपल्याला सहज इंद्रियगम्य व जन्मप्राप्त आहे, त्या दर्शनाखेरीज ह्या जगाचे ऋषी मुनींना झालेले दर्शन हे तपस्येने, योगाने, समाधी शास्त्राने प्राप्त होऊ शकते. भक्तीने देखील होऊ शकते व तसे ते आमच्या संतमंडळींना झाले, हे सत्य आहे.


" अगा मी ब्रह्माची पाहिले" असा ब्रह्मसाक्षात्कार होऊ शकतो. मग, सत्य जग कुठचे? माझ्या शारिरीक अस्तित्वाचे सामाजिक अस्तित्वाचे व्यक्तिमत्त्वाचे सत्य कोणते? भौतिक दर्शन सहज साध्य आहे. पण, भौतिक दर्शनाला जर 'A' दृश्यच सत्य वाटत असेल व 'B' दृश्य - म्हणजे 'B' भिंत समोरची बाजू आहे-असे दिसत नसेल, तर तो स्वतःच्या जन्मप्राप्त दर्शनाच्या 'पिंजऱ्याचा गुलाम व वकीलही बनतो; आणि 'B' दर्शनाला सत्य मानायला तयार होत नाही. 'आध्यात्मिक दर्शन', 'ब्रह्माचे दर्शन' ह्या जगात ठिकठिकाणी, वस्तुमात्रांत होऊ शकते ह्या सत्यावर विश्वास ठेवायला हा दर्शनी माणूस तयार नसतो. त्याची गोष्ट कशाला-ज्यांना आपण थोर शास्त्रज्ञ म्हणता त्यांनाही हे दर्शन होत नाही!!

पण, कौशसनेसमध्ये ह्या दर्शनातील विविध बाजू बघण्याची शक्यता व संभवता निसर्गनिर्मित किंवा ईश्वर निर्मित योजनाच आहे. त्याचे हे चित्र प्रतीकासारखे आहे.

त्यात 'C' ही जी A व B खेरीज एक C स्थिती दाखविली आहे, ती स्थिती प्राप्त करणे मानवाला आवश्यक आहे.

हाच दृष्टिभ्रम, व सत्यदर्शन ह्यातील खेळ सगळ्या जगाला युगानयुगे ग्रासून राहिला आहे. त्याचे प्रतिबिंब हॉलीवुडच्या लोकप्रिय चित्रपटांतही पडले आहे. अन्य दोन चित्रपटांची उदाहरणे मी आता देतो.

Bourne Identity




चित्र नं. २

चित्र नं. २ हे 'The Bourne Identity' ह्या गाजलेल्या हेरकथेचे आहे. हे एका थरारक चित्रपटाचे नाव आहे.

सुरुवतीलाच समुद्रामध्ये तरंगत असलेल्या एका तरुण माणसाचे शरीर दिसते. त्याच्या पाठीत दोन पिस्तुलच्या गोळ्या लागलेल्या दिसतात. ह्या नटाचे काम 'मॅट डॅमनने' केले आहे. एका फिशिंग बोटीवर त्याला जाग येते, पण तो कोण आहे, त्याला कोणी गोळ्या घातल्या व त्याचे पूर्वायुष्य काय आहे, याची त्याला बिलकुल स्मृती नाही. पण, त्याच्या खिशात एक 'कोड नंबर' असलेले कार्ड सापडते.

आपल्या अस्तित्व जपण्याच्या ह्या एकमात्र सूत्राचा- धागा दोऱ्याचा उपयोग करण्याखेरीज त्याला दुसरा कुठचाच प्रत्यवाय राहिला नव्हता. हा कोड नंबर 'स्विस बँकेतील' मोठ्या अकाउंट होल्डरचा असतो. बँकेत गेल्यावर त्याचे थाटात व योग्य तऱ्हेने स्वागत होते. 'चेकिंगही' होते. ह्या खात्यात सेफ डिपॉझिट व्हॉल्टमध्ये अनेक पासपोर्ट, रिव्हाल्वर, गन, हजारो डॉलर्सची कॅश असते. बँकेच्या अकाउंट प्रमाणे त्याचे नाव 'कोर्न' व रहाण्याचा पत्ता 'पॅरिस' असतो.

आपल्याला ह्यापुढल्या 'थ्रिलर' गोष्टीमध्ये जावयाचे नाही, पण स्वतःच्या अस्तित्वाच्या खरेपणाविषयी व त्या व्यक्तित्वाच्या स्मृतीबद्दचा जो त्याचा दयनीय, केविलवाणा लढा चालतो व त्याच्या खऱ्या पर्सनॅलिटीची पूर्ण माहिती असणारे, F.B.I. व इतर एजंटसट त्याचा जीव घेण्यासाठी पराकाष्ठेची धडपड करत असतात, ह्या घटनांनी थ्रिलर व स्पायस्टोरी शेवटपर्यंत चालू रहाते.

ह्या त्याच्या धडपडीत त्याला मेरी पोर्टेट ह्या ज्यू मुलीची योगायोगाने मदत होते. पण बोर्नला मात्र स्वतःच्या खऱ्या अस्तित्वाचा शोध घेण्यासाठी ह्या जगातच त्याच्या पूर्वायुष्याच्या खुणा शोधाव्या लागतात. त्याचे पूर्वायुष्य एका भाडोत्री मारेकऱ्याचेच आहे. त्या पूर्वायुष्याचा उलगडाही त्याला प्रयत्नांतीच लागतो. बाकी चित्रपट नेहमीच्याच हॉलीवूडची प्रतिकृती आहे. मग ह्या चित्रपटाचा आपल्या विचारांशी कोणता संदर्भ?

Matrix



चित्र नं. ३

दुसरा चित्रपट म्हणजे 'Matrix' मॅट्रिक्स नावाची 'Triology' म्हणजे तीन भागांची सिरीयल. चित्र नं.३ पहा.

ह्या चित्रपटाचे पहिले दोन भाग पाहून प्रेक्षकांना काही बोध झाला नाही. तिसरा शेवटचा भाग पाहिल्यावरही सध्याच्या सर्वसाधारण बुद्धीच्या प्रेक्षकाला त्याच्या कल्पनाशक्तीला पूर्ण ताण द्यावा लागतो. ह्याचे कारण ह्या ट्रॉयालॉजीत नट, नट्या ह्यांना 'conscilouness' मानवी कॉंशसनेसमधील मोठ्या कोड्याच्या संदर्भात प्रतीकात्मक भूमिका आहेत. "Matrxi is an exploration of consciousness" मॅट्रिक्स हा कॉंशसनेसचा शोध घेण्याची धडपड आहे.

ह्यात Zion झियॉन, नावाचा मानवी फॉर्म हा शरीरांचे प्रतीक आहे 'मॅट्रिक्स' म्हणजे 'मानवी मन' आणि एक यंत्र अशी भूमिका असलेला नट 'Actor' म्हणजे तिसऱ्या भागातील सुवर्ण रंगाची कॅरेक्टरअसते. म्हणजे 'स्पिरीट' किंवा ' आत्मा' होय. आपण सर्व मानवजात 'we are caught in the Matrix of the Mond and so we do not realise the consciousness the source of everything, is the very source of our being."

"आपण सर्व एका मनाच्या जाळ्यामध्ये सापडलेले सावज आहोत. त्यामुळे, म्हणूनच आपल्याला सगळ्या गोष्टींचे मूळ 'कॉंशसनेस' मध्ये आहे व हाच कॉंशसनेस आपल्या अस्तित्वाचे मूळ आहे हे समजत नाही."

### विल्बरचे भाष्य

Ken Wilber (केन विल्बर) हा एक जगप्रसिद्ध अमेरिकन बुद्धिवादी तत्त्वज्ञ आहे. त्याचे 'Integral World, Integral Philosophy, Integral Sprituality' ह्याची Website वेबसाईट आहे व ही एक मोठी 'चळवळ' आहे. त्याचा व लॅरी वाचोवस्की यांचा Matrix ह्या चित्रपटावरील संवाद गाजलेला आहे. अनेक विचारवंताना ह्या चित्रपटाने भुरळ घातली आहे व चित्रपटांचा अर्थ लावण्याचा अनेक जण प्रयत्न करताहेत. अनेक प्रबंध, शोध व पुस्तके लिहिली गेली आहेत. 'Journey to the Source' हे त्यांतील एक।

Modern Painting मॉर्डन पेंटिंग चे वैशिष्ट्य काय?एका बाजूला ते आपल्याला चित्राचा आनंद, नेत्रसुख सौंदर्य स्पर्श देतच असते, पण दुसऱ्या बाजूला ते आपल्याला विचार करावयाला प्रवृत्त करते.

तसेच मॅट्रिक्स ह्या सायन्स फिक्शन थरारक चित्रपटाचे आहे. केन विल्बर म्हणतात मॅट्रिक्स चित्रपटाच्या तिसऱ्या भागता रोझेशा स्टोन जवळ जवळ वीस मिनिटांत त्या चित्रपटाचा गूढ अर्थ ध्वनित करते.

निओ जेव्हा विचारतो की "ही यंत्रे मी जशी पहातो तशी तुला दिसतात का? ती सर्व प्रकाश आहेत - चैतन्याचाच प्रकाश"

मॅट्रिक्स म्हणजे एक शरीर यंत्र!! त्या मॅट्रिक्सच्या

शरीरातील वाईट, शरीराबाहेरील - मॅट्रिक्स बाहेरील - चांगले - म्हणजे सत्य!! मॅट्रिक्स मध्ये सापडलेले सर्वजण बंदिस्त गुलाम व मॅट्रिक्सच्या बाहेरील 'स्वतंत्र - फ्री' !!

दुसऱ्या भागात निओ ओरॅकलला म्हणतो की
'तू माणूस नाहीस ना !
ती म्हणते "नाही"!!
"मग तू प्रोग्रॅम आहेस ना?" निओ
"होय !!" - ती म्हणते!!

इथे केन विल्बर म्हणतात, "या संवादानंतर धक्का बसतो व प्रत्येकजण डोके खाजवू लागले - आपण ही. कारण, या क्षणी आपण नकळत चित्रपटाच्या पडद्यावरील भ्रमातून बाहेर पडतो. आता आपण भाषेच्या तत्त्वज्ञानाच्या सखोल जाळ्यात किंवा पातळीवर खेचले जातो. आता ह्या वैचारिक पातळीवर अगोदर पाहिलेल्या चित्रपटांतील - मॅट्रिक्स सिनेमातील अनेक घटनांचे, संवादांचे, भूमिकांचे, प्रतीकांचे खरे अर्थ शोधू लागतो!! ह्या सगळ्या कोड्याचा आवाका व हेतू - गूढार्थ शोधू लागतो.

ह्या कोड्याचा पूर्ण उलगडा तेव्हाच होतो की जेव्हा मॅट्रिक्स सिनेमाचा तिसरा भाग आपण जास्त जास्त सखोल बुद्धीने - जागरूकतेने पाहू लागतो. तेव्हा 'दृश्य' चित्रांच्या मागे असलेल्या गूढ सत्याची पुसटशी जाणीव नकळत होऊ लागते.

केन विल्बर म्हणतात की त्यांतील आर्किटेक्ट, ओरॅकल, स्मिथ वगैरे बोलू लागतात, तेव्हा लक्षात येते की चित्रपटाच्या पहिल्या दोन भागांत Body, Mind and Spirit म्हणजे शरीर, मन, व आत्मा हे Alienated म्हणजे एकमेकापासून स्वतंत्र, वेगळे असे वागतात तर मॅट्रिक्स चित्रपटाच्या सितऱ्या भागात त्यांचा एकत्रित, संयुग्म (पुरुष सहस्रशीर्ष अवयवी) संबंधात दर्शन होते. केन विल्बर ह्या दर्शनाला Resurrected, healed or Integrated हे शब्द वापरतात. हे शब्द व संकल्पना ह्या ख्रिश्चन धर्म, बायबल ह्यांतील जीझस, ख्राईस्ट ह्याच्या पुनरुज्जीवन Resurrection ह्या संकल्पनेवर आधारलेले आहेत. Flesh and Soul ह्या संकल्पनेवर आधारलेले आहेत.

आपल्या संस्कृतीत - वेदिक संस्कृतीत ही संकल्पना ऋग्वेदातील पुरुषसुक्तातील पुरुष व अवयवी संबंधावर मांडली आहे. ह्यात पुरुष म्हणजे विश्व - रचना, रूप व कार्य ह्या अर्थाने व दशांगुली पुरुष म्हणजे शरीरी मानव - शरीर व जीवात्मा ह्यांचा संबंध ह्या संकल्पना मांडल्या आहेत.

दीपक चोपरा (एम्. डी.) हे पाश्चात्य संस्कृती व पौर्वात्य संस्कृतीकडे एकात्म दृष्टीने पहाणारे मेडिकल प्रोफेशनमधील विचारवंत आहेत - अमेरिकन - इंडियन आहेत

त्यांचे 'Quautum Healing' हे पुस्तक गाजलेले आहे व त्यानंतर त्यांनी अनेक पुस्तके लिहिली, व्याख्याने दिली नुकतेच ते भारतातही आले होते.

त्यांचे महत्त्वाचे म्हणणे हे आहे की आम्ही 'शरीरी मानवाचे' जे मॉडेल गृहीत धरले आहे किंवा सध्या प्रचलित व राजमान्य आहे, तेच चुकले आहे.

माणूस हा एक 'Priological Machine' म्हणजे 'जैविक यंत्र' आहे असे आपण मानतो आहोत.पण खरी वस्तुस्थिती कोणती आहे? आयुर्वेदात मानवी शरीर म्हणजे 'वैश्विक प्रज्ञाशक्तीचा एक प्रवाह -स्त्रोत' आहे. त्या आकाशगंगेच्या स्त्रोत प्रज्ञा प्रवाहात बुद्धीचा विकास होतो आहे आणि हा मानवी जीव केवळ एक तरंग आहे.

पदार्थ विज्ञान शास्त्रातही व अॅस्ट्रॉनामीमध्ये ही हे विश्व एक शक्ती व 'इन्फर्मेशन' क्षेत्र आहे. त्यामध्ये अनेक उप क्षेत्रे आहेत.

आता जे नवीन विश्वचित्र उलगडते आहे, त्याला Psycho Physiological Science of

Consciousness' असे स्वरूप आहे.

ह्यावर दीपक चोप्रा जे भाष्य करतात ते उद्बोदक आहे, त्यात वेदिक ज्ञानाचा संदर्भ देतात.

Te Body is not a machine, that learns to think, but that the body is a Spritual "thought" that reflects itself into form. It is one level in a hierarchy of choerent or intelligent energy states:

"Is the void made up of nothing, is it a fullness of non-material intelligence, which interact with its own self and creates both mind and matter, that we are physical machines that have learned how to think, we are infact impulses of intelligent thoughts that have learnt how to create the physical machine, that consciousness interacts with its own self and ultimately creates both mind and matter. Matter is the epiphenomenon and consciousness is the phenomenon. It is consciousness that conceives, governs and constructs and actually becomes the physical body and ultimately, the whole universe. In other words, to think is literally to create" [chopra, 1990]

चोप्रा यांच्या वरील म्हणण्याचा मथितार्थ हा आहे की, हे जे 'अव्यक्त 'unmanifest जग आहे ज्यातून 'व्यक्त' निर्माण होते, ते रिकामे क्षेत्र आहे का? किंवा त्यात जडरहित, वस्तूरहित अशी 'बुद्धी' Intelligence भरून आहे का?

वेदांचे भाष्य असे आहे की, या अव्यक्त जगातच प्रक्रिया होऊन जड वस्तू व जड मन तयार होते.

आपण काही एखादे यंत्र नव्हे की जे विचार करु शकते. उलट, आपण म्हणजे एक बुद्धी मानसाचा व प्रज्ञा विचारांचा पुंजका आहोत की ज्याने जड यंत्रणा निर्माण केली व स्वतःशीच मानसप्रक्रिया (यज्ञ) करून ह्या कॉंशसनेनेच जड वस्तू व जड मन निर्माण केले.

चोप्रा पुढे मॉर्डन फिजिक्स मधून काही संकल्पना उद्धृत करतात."He defines the dynamic energy exchanges between a system and increasingly larger fields of coherent energy (Intelligence). As humanity improves its insight into this phenomenon we can trigger corresponding advances of our C/ consciousness of the larger cosmos."

### पुन्हा वेदांकडे

आपल्या विश्वाच्या रचनेबद्दल, उगमबद्दल ज्या निरनिराळ्या संकल्पना (शास्त्रात किंवा धर्मात) मांडल्या गेल्या आहेत, त्यामध्ये ह्या नवीन पुराव्यांमुळे उलथापालथ होणे अपरिहार्य आहे.

वेदिक संकल्पनेतील विश्वनिर्मिती ही तीन शक्तींवर आधारलेली मानली आहे व हा विश्वास युगायुगात टिकून राहिला आहे. आजतागायत -त्याच दिशेने दीपक चोप्रा आपल्या विचारांची मांडणी करताना आढळेल.

१. इच्छा शक्ती

२. ज्ञान शक्ती

३. क्रिया शक्ती

ह्या आहेत तीन मूलभूत शक्ती. त्या Non-material म्हणजे जड नाहीत पण अंतर्गत चैतन्याने भरलेल्या किंवा संपृक्त आहेत.

त्याच्या 'यज्ञक्रियेने' हे विश्व निर्माण झाले हे एक विलक्षण, अनादी, चैतन्ययुक्त, स्वंय प्रेरित स्वयंनियंत्रित असे यंत्र (Matrix म्हणू या का?) आहे. त्याला कार्य, क्रिया आहेत व त्यांना एक गूढ, अनाकलनीय (सध्यातरी) दिशा आहे.

<u>पुन्हा चोप्रा</u> : दीपक चोप्रा हे आपल्या शरीराबद्दल

सध्याच्या विज्ञानशास्त्रात जे ज्ञान प्राप्त झाले आहे, त्या पुराव्यावर मानवी शरीराचीच जी मांडणी करतात, जे रूप दाखवतात, त्या आधारावर आपल्या 'मानवी शरीर' संबंधीच्या सर्व कल्पनांना धक्का बसेल. एवढेच नव्हे तर ह्या शरीराचा जो 'स्वामी' त्याच्या स्थानाबद्दल, रूपाबद्दल, कर्तृत्वाबद्दल भविष्याबद्दल व विश्वसंबंधांबद्दल (Relations with the cosmos) प्रश्न निर्माण होतील. ह्या सगळ्याबद्दल क्रांतिकारी दृष्टी पैदा होईल व सगळ्या भौतिक, वादी, सामाजिक, राजकीय, तत्त्वज्ञानविषयक व धार्मिक संकल्पनांना धक्का बसेल आणि वैदिक संकल्पनेतील 'सत्याचे' दर्शन घडेल.

तो उतारा इंग्रजीतच देतो व तो सहज समजू शकेल, "10 to the 22nd atoms are included in a single breath and become a part of body. Exhaled are 10 to the 22nd atoms per breath that were once part of the body. These well defined edges to the body are merely artifiacts of sensory perceptions. We are part of a cosmic body that is constantly in exchanges with its own self. Each person contains atleast 1,000,000 atoms that were in the body of Jesus, Budhham Tomas Torguemada, Ghangus Kahn... every being of a distant historical period... We acquire a new liver every six weeks at the atomic level, a new skin once a month, a new stomach living evey five days, even the brain cells that you think with are physical atoms of cabon, nitrogen, hydrogen and oxygen that weren't there last year, In less than one year 98% of all the atoms of the body are replaced, DNA which holds the memory of millions of years of evolutionary time, the raw material of it is replaced every six weeks. In four years we will replace entire body, 98% of it is replaced in one year [chopra].

त्यांच्या विधानांच्या थोडक्यात परामर्श घ्यावयाचा तर आपल्या शरीरात प्रत्येक श्वासाबरोबर १० ते २२ ग्रॅम (अणू) येत असतात व ते शरीराचा भाग बनतात. उलट प्रत्येक उपवासाबरोबर १० ते २२ अणू शरीरातून अलग होऊन वातावणांत मिसळत असतात. त्यांमुळे, जीझस क्राईस्ट , बुद्ध, चंगीजखान वगैरे ऐतिहासिक (मृत) व्यक्तींनी श्वास व उच्छ्वास यांनी वापरलेल अणूच आपणही वापरत आहोत.

आपल्या शरीराच्या फॉर्मच्या ज्या कडा, सीमा आहेत - म्हणजे कातडी किंवा स्कीन ही इंद्रिय निर्मित दृष्टीची एक साधन आहे. संबंध विश्व एकच आहे. एकत्रच श्वास करीत आहे. आपल्या शरीरातील लिव्हर ६ आठवड्याने, स्किन १ महिन्याने, आतड्यांचे कव्हर ५ दिवसांनी, एवढेच काय पण, मेंदूचे ॲटमही १ वर्षात बदलत असतात. DNA ज्याच्यामुळे जन्मजन्मांतरीची स्मृती रहाते, तेही ६ आठवड्यांनी बदलत असतात. चार वर्षात आपले सर्व शरीर बदलले असते. व ९८ टक्के तर एका वर्षातच बदलेले असते. प्रश्न असा पडेल की आपल्या शरीराची सामग्री ही सारखी बदलत असते व आपण निसर्गात त्या सामग्रीची उसनावरी, देवाण घेवाण करत असतो. मग 'मी' माझे व्यक्तिमत्व म्हणजे काय? मी व दुसरा आणि समाज ह्यामध्ये फरक कोणता?

## होलोग्राफिक मॉडेल

मानवी शरीराच्या किंवा एकंदर फॉर्मच्या बद्दल नवीन संकल्पनेचा उदय होतो आहे. तो आहे 'होलोग्राफिक मॉडेल' हा सिद्धांत प्रिब्रम ह्या वैज्ञानिकाचा आहे (१९७१) आपण एका स्पंदाच्या लहरींचा शक्ती समूह आहोत. आपली बुद्धी ही काही मेंदू किंवा ब्रेनच्या कुठल्यातरी एका स्थानामध्ये बंदिस्त व स्वतंत्र आहे असे नसून आपला मेंदू म्हणजे एक प्रकारचा "न्यूरो-बायोलॉजिकल ट्रॅन्सड्यूसर" म्हणजे मानसिक -जैविक- भाषांतर करणारा यंत्राचा भाग आहे.

ह्या विश्वाच्या उच्चतम चैतन्य शक्तीच्या अधिकाराखाली ह्या पृथ्वीवरील अनुभवांची मोट त्यांच्या व्याख्या व अर्थ करून 'रिपोर्टिंग' करत असतो. म्हणजे तो एक प्रकारचा छोटा ऑफिसर असतो. याचाच दुसरा अर्थ की, त्याची बुद्धी ही त्या सर्वोच्च बुद्धीचाच एक भाग सर्वोच्च शक्तीचाच एक भाग म्हणून गुंतवलेली वा बांधलेली असते.

हे मॉडेल 'क्वांटम फिजिक्स' च्या सिद्धांतावर किंवा 'दर्शनावर' म्हणू या, आधारित आहे.

तसेच ते मादाम ब्लॉटवस्की ह्यांच्या थिऑसफी ह्या फिलोसॉफीतील संकल्पनांशी सुसंगत आहे. इतरही काही नवीन संकल्पनांशी जुळते मिळते आहे.

**संभ्रमित जग**

पण, आपल्या ह्या सर्व परीक्षणाचा अर्थ काय घ्यावयाचा ?

आपल्या सध्याच्या प्रचलित शरीराच्या व मानवी मनाच्या, अस्तित्वाच्या ज्या कल्पना आपण पक्क्या धरून चालत आहोत, त्या वास्तविक चुकीच्या व भ्रमावर आधारलेल्या आहेत. त्यांना वैश्विक सत्य किंवा cosmic Reality चे status नाही.

असे असूनही आपण ह्या भ्रमात्कमक संकल्पनेवर व्यवहार करीत आहोत. आपल्या सामाजिक, राजकीय व शास्त्रीय - वैद्यकीय व्यवहारात ह्या चुकीच्या मॉडेलवर आधारित व्यवहाराच्या कायदा, नाती यांची जाळी बांधून खोट्या समाधानात रहात आहोत. आपला जन्म, मृत्यू व ह्या निसर्गाचे नाते ह्याबद्दल आपल्याला वैश्विक सत्याचा आधार नाही. परस्पर अज्ञानातील एकवाक्यतेवर आपण आपला व्यवहार बांधला आहे. अर्थातच आपल्यातील संघर्षाला, अंधविश्वासाला हे अज्ञानच कारणीभूत आहे!!

एवढेच नव्हे, तर मानवी ज्ञानाला सध्या प्राप्त झालेले Quantum Physics चे ज्ञान हेही काही अंतिम ज्ञान नव्हे.

मॉर्डन फिजिक्सचा दावा असा आहे की Falsification of the earlier thesis म्हणजे अगोदरच्या सिद्धान्तला खोटे ठरवीत विज्ञान प्रगतिपथावर कूच करत असते!!

त्यामुळेच, लेखाच्या सुरुवातीला Bourne Identity व Matrix ह्या सिनेमातील नायक जो स्वतःच्या अस्तित्वचा शोध घेत असतात. तोच संदर्भ मॉर्डन फिझिक्स मध्येही चालू आहे.

ह्या केविलवाण्या, दयनीय धडपडीस काही पर्याय आहे काय? ह्याचे उत्तर हवे असेल तर 'भारतीय संस्कृतीत - वेद उपनिषद, भगवद् गीता व त्यांतील ज्ञान व्यक्त अनुभूतीत आणणाऱ्या साधनांनी मिळू शकेल पण, सध्यातरी समाजाचा हा विश्वास नाही, उलट अपसमजच जास्त आहेत.

पण हे विश्व काही मानवी तर्कांवर चालत नाही. त्याची निर्मिती, उत्क्रांती एका विशिष्ट दिशेने वाटचाल करत आहे.

देव की चित्रपट? पण, त्या वाटचालीवर प्रकाश टाकील असा वैदिक ज्ञानप्रकाशाचा दीपस्तंभ असूनही त्याकडे दुर्लक्ष करण्याचा उपदेश कळत नकळत मानवी समाजाचे पुढारी करीत आहेत.

देव करो व सर्वांना सुबुद्धी होवो. तोपर्यंत आपण चित्रपट पहात राहूया, नाही का?

**यशवंत साने**

सोनल अपार्टमेंट, सारस्वत बँकेजवळ,

अग्यारी लेन, ठाणे - ४०० ६०१.

Tel. : 2536 84 50 Email : yrsane@eth.net

# रामायण - एक चिरंतन संस्कार प्रतीक

*प्रभु रामचंद्र व रामायण महाकाव्याचे संदर्भ सामान्य माणसालाही व्यापून उरतात. म्हणून रामायण हे भारतीय संस्काराचे चिरंतन प्रतीक ठरते.*

काही वर्षांपूर्वी एक गोष्ट वाचनात आली होती. सिस्टर निवेदिता नुकत्याच भारतात आल्या होत्या. काही तरी सामाजिक कार्य करावं अशी त्यांची इच्छा होती. विशेषतः भारतीयांना शिक्षित करावं. असा त्यांचा मानस होता. स्वामी विवेकानंदांजवळ ही इच्छा जेव्हा त्यांनी बोलून दाखवली तेव्हा स्वामी म्हणाले "प्रथम तुम्ही सर्वत्र फिरा, इकडील लोकांशी संवाद करा आणि नंतर काय करायचं ते ठरवा."

सिस्टर निवेदिता सहा महिने सर्वत्र फिरल्या. लोकांशी संवाद साधला. चर्चा केल्या त्यानंतर जेव्हा त्या स्वामीजींना भेटल्या तेव्हा म्हणाल्या, "भारतातील लोकांना शिक्षण द्यावे अशी माझी इच्छा होती, पण इथं तर दोन मोठ्या शिक्षण संस्था आधीच ते कार्य करत आहेत." स्वामीजी त्यांच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहू लागले तेव्हा त्या म्हणाल्या, "रामायण आणि महाभारत या त्या दोन संस्था."

ब्रिटिशांसारख्या मतलबी पाश्चिमात्य राज्यकर्त्यांना इकडच्या प्रत्येक भाषिक गट म्हणजे एक राष्ट्र वाटलं आणि भारताचे तसे तुकडे पडतील अशी आशाही ते बाळगून होते. परंतु काश्मिर पासून कन्याकुमारीपर्यंत आणि कच्छपासून आसामपर्यंत संपूर्ण भारतवर्षाला सांस्कृतिक दृष्ट्या या दोन ग्रंथांनी एक राष्ट्रीयत्वाच्या भावनेत घट्ट बांधून ठेवलं होतं.

त्यातही भारतीयांच्या नसानसातून भिनलेल्या आणि हजारो वर्षांनंतर आजही प्रती होणाऱ्या नैतिकतेच बीज रामायण कथेतून रुजलेले होत हे नाकारता येणार नाही.

पित्याने सावत्र आईला दिलेल्या वचनाची पूर्तता करण्यासाठी राज्यपदाचा त्याग करून १४ वर्षांचा वनवास स्वीकारणारा राम, जिथे पती असेल तोच आपला राजमहल मानून वनवासास सिद्ध झालेली सीता, बंधुप्रेमानं वनवास पत्करणारा लक्ष्मण, रामाला वनवासास धाडल्याबद्दल स्वतःच्या सख्ख्या आईची निर्भत्सिना करून राज्यपद ठोकरणारा भरत, स्वतःच्या आशांचीही पर्वा न करता प्रभू रामचंद्रासांठी कोणतेही कार्य करण्यास सदैव तत्पर असणारा रामभक्त हनुमान असे महान आदर्श निर्माण करून रामायण कथेत भारतीय संस्कृती घडवली. भारतातील जवळ जवळ सर्व भाषांतून निरनिराळ्या स्वरूपात ती प्रकट झाली.

या कथेने एका बाजूला मानवी सद्गुणांचा दर्शन घडवले. या सद्गुणांच्या परमोच्च आविष्कारातूनच मानवाच्या अंतर्यामी असणाऱ्या दैवी अंशाच प्रकटीकरण होत असा आदर्श निर्माण केला. दुसऱ्या बाजूला ऐहिक सुखासाठी, स्वार्थासाठी मानव कोणत्या थराला जातो. त्यातूनच सामाजिक मूल्यांना आणि समाज मनाला कसा धक्का बसतो त्याचेही दर्शन घडवले.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आसुरी शक्ती, त्यांचा अंहकार व त्यातून समाजावर चालणारी त्यांची जबरदस्ती यांचेही दर्शन घडवले आणि या पृथ्वीतलावर 'रामराज्य' निर्माण करायचे असेल तर दैवी मानवी शक्ती आणि आसुरी शक्ती यांचा संघर्ष अटळ आहे हे समाजास दाखवून दिले. अशा प्रकारच्या संघर्षात दैवी शक्तीचे पाठबळ सत्प्रवृत्तींच्या मागे उभे राहते आणि अंतिम विजय हा सत्प्रवृत्तींच्याच होतो असा विश्वास निर्माण केला.

एका बाजूने लोकांचे मनोरंजन करत ही रामकथा भारतातील सर्व भाषांतून निरनिराळ्या पद्धतीने सांगितली गेली. परंतु काही विचारवंताना आणि सत्यशोधकांना त्या कथेमध्ये काही मूलभूत तत्त्वांचे दर्शन घडले. प्रत्येक व्यक्तिरेखा, प्रत्येक घटना त्या मूलभूत तत्त्वांचे एक प्रतीकात्मक स्वरूप आहे असे जाणवले. हे प्रतीकात्मक स्वरूप आणि त्यातून निर्माण होणारा बोध याच दर्शन घडवण्याचा अशाच एक प्रांजल प्रयत्न, प्रभुरामचंद्रावर आणि त्याच्या जीवनकथेवर नितांत प्रेम करणाऱ्या रामभक्तांना आवडेल, अशी आशा व्यक्त करून त्या कथेस प्रारंभ करतो.

अयोध्येचा राजा कोण तर दशरथ. दशरथ म्हणजे दहा इन्द्रियांच्या रथांत बसून जीवनाची मार्गक्रमणा करणारा. दहा इंद्रिये म्हणजे कान, डोळे, नाक, जीभ आणि त्वचा ही पाच ज्ञानेन्द्रिय आणि हात, पाय, वाणी, जनेनन्द्रिय, व गुदद्वार ही ५ कर्मेन्द्रिये.

या राजा दशरथाला तीन बायका कौसल्या , सुमित्रा व कैकयी. म्हणजे वस्तुतः या जीवनाच्या खडतर प्रवासात मानवाला सहाय्यभूत ठरणारे भक्ती, ज्ञान व कर्म असे तीन मार्ग.

परमेश्वराच्या कृपाप्रसादाने दशरथाला राम, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न असे चार पुत्र प्राप्त होतात. हे चार पुत्र म्हणजे वस्तुतः धर्म, अर्थ, मोक्ष व काम असे चार पुरुषार्थ. ज्याप्रमाणे लक्ष्मण हा कधीही रामाची साथ सोडत नाही त्याप्रमाणे अर्थ हा नेहमी धर्मावर अधिष्ठित असावा. तसेच ज्याप्रमाणे भरताने शत्रुघ्नाला संयमित केले त्याचप्रमाणे मोक्षच्छेने काम संयमित करावा.

भक्ती आणि ज्ञान यांना दूर सारून मानव जेव्हा स्वार्थ साधण्यासाठी कर्मरत होतो तेव्हा त्याची स्थिती कैकयी रत झालेल्या दशरथासारखी होते.

ज्याप्रमाणे कैकेयीने आपली इच्छा पूर्ण करण्यासाठी कौसल्या व सुमित्रा यांना दूर सारून दुराग्रहाने रामाला वनवासात धाडले त्याचप्रमाणे भक्ती आणि ज्ञान यांचा तिरस्कार करणारा मानव जेव्हा केवळ स्वार्थ साधण्यासाठी कर्म करू लागतो. तेव्हा त्याच्या जीवनातून धर्म हद्दपार होतो.

रामाला वनवासास धाडताना राजा दशरथ दुःखाने व्याकूळ झाला होता. पण कैकेयीची इच्छा, कैकेयीत गुंतलेले त्याचे मन आणि तिला दिलेले वचन यामुळे त्याचा नाईलाज होतो. पण ते कर्म करताना आणि केल्यावरही त्याचे मन त्याला सारखे खात होते. मानवाची शुद्ध जाणीव नेहेमीच जिवंत असते. आणि वासनेच्या आहारी जाऊन तो जेव्हा करू नये ते करून बसतो तेव्हा त्याचं मन त्याला खात रहातं. त्याच्या अंतर्यामी असणाऱ्या शुद्ध जाणिवेला होणार दुःख त्याला आतून जाळत असतं. आणि त्यातच त्याचा दशरथाप्रमाणे अंत होतो.

धर्माच्या अधिष्ठानाचं सर्वश्रेष्ठ प्रतीक असणारा, राम प्रभु रामचंद्र म्हणजे साक्षात परमात्मा आणि त्यांची पत्नी सीता म्हणजे जीवात्मा. उपनिषदातील दोन पक्ष्यांच्या कथेप्रमाणे वस्तुतः एकजीव असणारे परंतु अज्ञानामुळे अलग भासणारे.

प्रभू रामचंद्र जेव्हा वनवासात निघतात. तेव्हा सीतामाई त्यांच्याबरोबर वनवास पत्करते. प्रभुरामचंद्राच्या सहवासात अरण्यातील झोपडीमधील खडतर जीवनही तिला राजमहालापेक्षा सुखाचे वाटते. जेव्हा जीवात्म्याला परमात्म्याची ओढ लागते व तो त्याच्या चिंतनातच अहोरात्र मग्न रहातो तेव्हा कितीही दुर्धर परिस्थितीत तो जगत असला तरी त्याला चिरंतन आनंदाचा आणि अवर्णनीय सुखाचा लाभ होतो. मात्र हे सुख आणि हा आनंद परमात्म्याच्या सहवासाची गोडी जोपर्यंत कायम असते तोपर्यंतच टिकते. जर त्या जीवात्म्याला पृथ्वीवरील क्षणिक सुखांची

अभिलाषा वाटू लागली, प्रत्यक्ष परमात्म्याचा सहवास असतानाही इतर क्षणिक सुख अधिक गोड वाटू लागली तर त्या जीवात्म्याची गत सुवर्णमृगाच्या प्राप्तीची भुरळ पडलेल्या सीतेसारखी होते. आणि तो जीवात्मा परमात्म्यापासून दूर फेकला जातो.

अशा या परिस्थितीत ज्याप्रमाणे दशमुखी रावणाने सीतेला पळवून नेऊन लंकेत बंदिवासात ठेवलं त्याचप्रमाणे मोहवश झालेला जीवात्मा त्याच्या दहा इंद्रियांच्या वेढीत अडकतो आणि या दुःखमय संसारात बंदिवान होतो.

वस्तुतः सीता बंदिवान असली तरी ती अशोकवनात होती. परंतु अज्ञानामुळे तेथून बाहेर कसे पडावे हे तिला समजत नव्हते. तेवढे सामर्थ्य व इच्छाशक्तीही दुःखामुळे तिच्याजवळ उरली नव्हती. त्यामुळे अ-शोक वनात असूनही ती शोकमग्न होती. परमेश्वरानं निर्माण केलेलं हे जग खरोखर सुंदर आहे, सुखकारक आहे. परंतु अज्ञानामुळे अंध बनलेल्या जीवात्म्याला सत्याचा प्रकाश दिसत नाही त्यामुळे त्याला हे जग दुःखकारक वाटतं. अशोकवनात राहूनही तो शोक करत बसतो. त्या जीवात्म्याचं मानवी मन जेव्हा उत्क्रांत पावेल. तो जाणिवेच्या उच्च स्तरावर जाईल तेव्हा त्याला सत्याचा प्रकाश दिसेल, चिरंतन आनंदाचा अनुभव मिळेल, या पृथ्वीतलावरही स्वर्गीय सुखाची जाणीव निर्माण होइल दैवी जीवनाची सुरुवात होईल. पण तोपर्यंत काय ...

सीतामाईलाही मुक्त कशी करायची त्याची चिंता प्रभुरामचंद्रही वहात होते. त्यांच्याच आदेशाने हनुमंताने सीतामाईला शोधून काढले. तिची प्रत्यक्ष भेट घेऊन तिला दिलासा दिला की लवकरच प्रभु तुमची मुक्तता करतील. जीवात्मा हा परमात्म्याचाच अंश. त्याच्या मुक्तीची काळजी परमात्मा वहातच असतो. मात्र, त्यासाठी तो एखाद्या भक्त श्रेष्ठांची, संतांची मध्यस्थी घेतो. त्याच्यामार्फत जीवात्म्याला मार्गदर्शन करून मुक्त करतो.

अशा तऱ्हेने सीतामाईला मुक्त करण्यासाठी रावणाच्या लंकेवर चालून जाण्याची श्रीरामचंद्रांची सिद्धता सुरू असताना रावणाचा भाऊ बिभिषण प्रभुरामचंद्राच्या सत्यपक्षाला येऊन मिळाला व त्याच्या सहकार्याने श्रीरामचंद्रानी लंकेवरील स्वारीची संपूर्ण व्यूहरचना केली. बिभिषण, रावण आणि कुंभकर्ण हे तीन बंधू वस्तुतः सत्व, रज आणि तम या तीन गुणांचे प्रतिनिधित्व करतात. रावणाच्या राज्यात सात्विक प्रवृत्तीच्या बिभिषणला किमंत उरली नव्हती आणि कुंभकर्णाला निद्रिस्त ठेवल होतं. स्वतःच आसन स्थिर ठेवण्यासाठी आणि स्वतःच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी राजसिक प्रवृत्तीचा शासनकर्ता एका बाजूला सात्विक प्रवृत्तीला झोडपत असतो तर दुसऱ्या बाजूला बहुसंख्य समाजात अज्ञान कायम ठेवून त्यास निद्रितावस्थेक ठेवत असतो. प्रभुरामचंद्रांनी म्हणजे परमात्म्याने सत्वगुणाला आधार दिला. त्याचं बळ वाढवलं आणि त्याच्या सहाय्याने रजोगुणाचा आणि तमोगुणाचा नाश करून जीवात्म्याला म्हणजे सीतेला मुक्त केले.

अशी ही श्रीरामकथा, जशी ५ हजार वर्षापूर्वी घडली तशीच ती आजही प्रत्येक व्यक्तीच्या जीवनांत घडत आहे. आणि म्हणूनच त्या कथेचे संदर्भ आजही आपल्याला पटतात, जिवंत वाटतात आणि ते बोधामृत प्राशन करून आजही आपण तृप्त होतो.

**नरेन्द्र नाडकर्णी**

सीडी - १०१; सी -१
श्रीरंग सोसायटी, ठाणे
Tel.: 25333160
Email : nd_nadkarni@yahoo.com

गीताविश्व

# धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे - स्वामी माधवानंद

## (महाभारत - युध्दप्रसंगातून गीता)(डॉ. माधव नगरकर)

## गीता - ज्ञानेश्वरी प्रथमोऽध्याय(गीता-ज्ञान १ )अर्जुन विषादयोग

*गीता हा भारतीयांचा महत्त्वाचा ग्रंथ. श्रीमती आशाताई भिडे यांनी या ग्रंथावरील अनेक ग्रंथाचा परिचय दिला आहे.- संपादक*

'धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे' हा २५३ पानांचा ग्रंथ (गीता व ज्ञानेश्वरी) फक्त प्रथमोध्यायावर, अर्जुन विषादयोगावर आहे. मुखपृष्ठावर सुंदर रथारुढ अर्जुनाला कुरुक्षेत्रावर भगवंत गीता सांगतांनाचे रंगीत चित्र आहे. आत तेच चित्र विस्तारित रूपात आहे. मलपृष्ठांवर लेखकाचे कार्य कर्तृत्व दिलेले आहे. ते फार मोठे आहे. थोर आहे.

भगवद्गीता व ज्ञानेश्वरी यामधील श्लोकांचे व ओव्यांचे सूक्ष्म विविरण करुन त्यातील अलौकिक असे सौंदर्य त्यांच्या अध्यात्मिक उंचीसह साधकांना उलगडून दाखवणे हे स्वामी माधवानंदाचे खास वैशिष्टय आहे.

**गीता** - ज्ञानेश्वरीवर गेली अठरावर्षे झालेल्या प्रवचनांमधून निर्माण झालेले सुंदर वाङमय ग्रंथरूपाने सर्व साधकांना उपलब्ध व्हवे या हेतूने 'गीता ज्ञान' ग्रंथमालिका निर्माण करण्याचा संकल्प स्वरुपयोग प्रतिष्ठान, पुणे या संस्थेने केला आहे. तसेच 'धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे' या सदर ग्रंथात महाभारताच्या पार्श्वभूमीवर गीता ह्या विशेष भूमिकेतून त्यातील व्यक्तिरेखांच्या वैशिष्ट्यांबरोबरच ठिकठिकाणी ज्ञानेश्वरीतील सौंदर्याचे दर्शन घडविले आहे. या ग्रंथमालिकेतील हा प्रथम ग्रंथ सर्वांना निश्चितच आवडेल.

भक्तियुक्त अंत:करणात या ज्ञानाचे गान होते, त्यालाच गीता म्हणतात. गीता म्हणजे ज्ञानाचं गीत. ते गात आहेत भगवंत.

ते गीतेचे स्वर मन-बुध्दीत निनादायला अथं पासून प्रारंभ झाला आहे. इति पर्यंत ऐकता ऐकता ते आपल्या अंतरी पूर्ण भरुन राहतील.

भगवद्गीतेचा पहिला अध्याय फारसा महत्वाचा नाही असं सर्वसाधारणपणे सांगितलं आणि समजलं जातं, पण महाभारतात गीतेचं जे कोरीव लेणं आहे त्याचा पहिला अध्याय हे अति आकर्षक प्रवेश दालन आहे. ते पाहून मन प्रसन्न वआत प्रवेशण्यास उद्युक्त होतं. पहिला अध्याय गीता प्रासादाचा पाया आहे.

युध्दप्रसंगाची ही गीतेची प्रसवभूमी गीता जन्माच्या वेदना प्रकट करते. त्याचे शब्दरुप म्हणजेच युध्दपूर्व प्रसंग. त्यातून जन्म पावलेल्या गीतेने जो पहिला रुदन ध्वनी केला तोच अर्जुनविषादयोग! हा गीतेचा पहिला अध्याय. या गीतेच्या पहिल्या अध्यायाच्या विवेचनाइतकेच तो विषय साकार करणाऱ्या महाभारतामधील कथाप्रसंग आणि व्यक्तिरेखा यांचेही विवरण केले आहे. गीतेच्या श्लोकाबरोबरच ज्ञानेश्वरीच्या निवडक ओव्यातील सौंदर्य आणि भावरसास्वाद एकाचवेळी करण्याचा प्रयत्न केला आहे.

मानवी पातळीवरुन दिव्य परिपूर्णतेची पातळी दाखविण्यासाठी आणि ती कशी गाठता येईल हे सांगण्यासाठीच गीतेचा जन्म झालेला आहे.

त्या वेळेला आधुनिक तंत्रज्ञान विकसित झालेले नसतांना संजय लांबून धृतराष्ट्राला युध्दाचं वर्णन कसं करू शकतो? हा पहिला प्रश्न व दुसरा गीता युध्दभूमीवर सांगितली जाणं कसं शक्य आहे? या प्रश्नांचा उलगडा करण्याचा प्रयत्न उपसंहारात केला आहे. कुरुक्षेत्राचे प्राचीन कालीन महत्व, राजा कुरु आणि कुरुक्षेत्र (कथाप्रसंग) कौरव पांडवांच्या युध्दासाठी कुरुक्षेत्र का? कुरुक्षेत्राची युध्दासाठी अनुकूलता, कुरुक्षेत्राची सांप्रत स्थिती यावर सविस्तर विवेचन धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे या प्रकरणात केले आहे. ज्ञानेश्वरीतील स्तवन सौंदर्य यावर एक प्रकरण आहे. यात महाभारत स्तवन आहे गीता स्तवन आहे.

आतां भारतकमळ परागु। गीताख्य प्रसंगु। जो संवादिला श्रीरंगु। अर्जुनेसी॥५०

भगवद्‌गीता प्रथमोध्यायातील प्रत्येक श्लोक म्हणजे या पुस्तकातील एकेक स्वतंत्र प्रकरण आहे. आपण नमुन्यादाखल पहिल्या श्लोकाचे पहिले प्रकरण बघुया-

॥ श्रीपरमात्मने नम:॥

अथ श्रीमद्‌भगवद्‌गीता

धृतराष्ट्र उवाच

धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सव:।

मामका: पाण्डवाश्चैव किमकुर्वत संजय॥

धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सव:।

मामका: पाण्डवा: च, एव, किम् अकुर्वत, संजय॥१॥

धृतराष्ट्र उवाच - धृतराष्ट्र म्हणाला,

संजय - "हे संजया,

धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे - धर्मक्षेत्रात असलेल्या कुरुक्षेत्रात

युयुत्सव: एव समवेता - युध्दाच्या इच्छेने एकत्र आलेल्या

मामका: च पाण्डवा: - माझ्या आणि पांडुच्या पुत्रांनी

किम् अकुर्वत - काय बरे केले?"

गीता ग्रंथाची सुरुवात धृतराष्ट्राच्या तोंडून झाली आहे. (श्रीकृष्ण संजय, अर्जुन यांच्या मुखातून न होता) त्याची काही कारणे आहेत. एक म्हणजे तो सत्ताधारी आहे. (धृत - म्हणजे धरुन ठेवलेली, राष्ट्र-सत्ता) त्याच्यानावातच ते आले आहे.) दुसरं अध्यात्म्याच्या क्षेत्रात मोठेपण गुणांवर ठरतं. त्याप्रमाणे धृतराष्ट्र सर्वात कनिष्ट, लहान म्हणून त्याला प्रथम बोलू दिलेलं आहे व शेवटपर्यंत चूप बसवलेलं आहे. लहानांनी गप्प बसायचं असतं तसं, असे स्पष्टीकरण दिलेले आहे.

त्यानंतर ज्ञानेश्वरीतील ओवीवर विवेचन मग धृतराष्ट्र एवढा अधीर का? संजयाने, 'धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे' अनेक ध्वनित अर्थ धर्मयुध्द (धर्मात जेव्हा अनीतीचं राजकारण आणलं जातं तेव्हा धर्मक्षेत्राचं कुरुक्षेत्राप्रमाणे युध्दक्षेत्र होतं) 'धर्म क्षेत्रे कुरुक्षेत्रे चा अध्यात्मिक अर्थ ज्ञान हा उद्देश हरवला की शरीर आणि अंत:करणरुपी धर्मक्षेत्राचं - कुरुक्षेत्राचं युध्दक्षेत्र होऊन जातं. अंत:करणात सप्रवृत्ती आणि असत प्रवृत्तीचं युध्द होत राहतं (अ-१३) मामका: पांडवा: म्हणण्यातून काय दिसते?

याप्रमाणे प्रत्येक श्लोकांवर सविस्तर असे स्वतंत्र प्रकरण आहे. त्यात महाभारतातले कथाप्रसंग व व्यक्तिरेखाही श्लोकाच्या अनुषंगाने आल्यामुळे हे पुस्तक फारच उत्कंठावर्धक व माहितीपूर्ण झाले आहे. ज्ञान जिज्ञासूंनी हे जरूर वाचावे अभ्यासावे. गीताज्ञान ग्रहण करता करता महाभारताचे आकलन एकत्रपणे या ग्रंथाद्वारे होते.

धृतराष्ट्राच्या प्रश्नाच्या श्लोकाचा दुसरा चरण 'मामका: पाण्डवाश्चैव' .... असा आहे. धृतराष्ट्राच्या दृष्टीने 'मामका:' प्राधान्य अग्रस्थान होते. संसार निष्ठांचे प्रश्न 'मामका:' ने सुरु होतात व ईश्वर निष्ठांची उत्तरं 'मामका:' ने सुरुवात करुन दिली जातात.

उपसंहारात 'युध्दामागच्या वेदना', 'कौरवांमधील धर्मनिष्ठांच्या धारणा', यात 'विदुर', 'भीष्म , द्रोण, कृप आणि विदुर', 'युयुत्सु', 'गांधारी', 'धर्मराज, भीम, श्रीकृष्ण'. 'श्रीकृष्णांच्या धारणानुसार कृष्णशिष्टाईतला परखडपणा', 'भीष्म आणि श्रीकृष्ण', 'कर्ण आणि श्रीकृष्ण', 'स्वार्थी किंवा उदात्त मोहाचा लेप', 'बुडणारा धर्म', , 'धर्मातल्या ऐकीव गोष्टी', 'धर्माचे तर्म', 'अर्जुनाच्या धर्मधारणा आणि श्रीकृष्ण', 'गीता कृष्णार्जुनांचे कार्य', प्रथम अर्जुनाच्या पातळीवर पोचणे आवश्यक, काही अनावश्यक मुद्दे' सात 'संजयाचे युध्दकथन', युध्दभूमीवर गीता कशी?' या घोषणेसह युध्दभूमीवरच सत्याग्रह करत बसण्यापेक्षा गीतेत सांगितलेल्या सत्याचा आग्रह धरणे जास्त फायद्याचे आहे. 'संजयाचे ऋण' श्रीकृष्णानंतर गीतेचे प्रथम उच्चारण करणारा संजय सर्वार्थाने योग्य आहे. काही वेळेला गीता ज्ञानेश्वरीच्या श्रोत्यांना वाटतं 'संजयाला ऐकता ऐकता ज्ञान झालं तसं आम्हाला का होत नाही?' पण संजय हा व्यासशिष्य होता, सत्‌शिष्य होता. तो ज्ञानी भक्त या अवस्थेला पोचलेला होता हे सर्वांना कुठे माहीत असत! त्यानेच गीताशास्त्र आमच्यापर्यंत आणलं म्हणून त्यालाही आदराने मनापासून नमस्कार.

पहिला अध्याय अर्जुनाच्या माध्यमातून आम्हालाही तीन गोष्टी शिकवतो-ईश्वराशी सख्य-संवाद साधा तो निश्चित मर्म दाखवेल. नीतिमत्ता, सदाचरण हा परमार्थाचा पाया आहे. पाया म्हणजे संपूर्ण इमारत नव्हे पण पायाशिवाय इमारत नव्हेच नव्हे, अर्जुनाचे हे गुण आपणही अंगीकारायला हवेत. कूळ आणि संस्कृती परंपरा जपायला हवी. पूर्वजांनी आपल्यापर्यंत आणून पोहोचवलेला हा वैचारिक, धार्मिक,अध्यात्मिक वारसा आपण आपल्या आचरणाने पुढच्या पिढीला द्यायला हवा. 'धर्ममय सहजीवनातून सत्त्वसंवर्धन करुन सर्वांनी मिळून आनंदमय सहजीवन जगावे, हे पहिल्या अध्यायातून सांगितले आहे. पुढचे अध्याय अंतिम सत्याच्या अनुभूतिप्रत जाण्याचा कसा प्रयत्न करावा ते सांगणारे आहेत. त्याचे आम्ही सर्व मिळून अध्ययनही करू.

२४ जून २००६ ला 'गीता ज्ञान' या ग्रंथमालिकेतला (५) हा प्रथम ग्रंथ प्रकाशित करुन 'गीता ज्ञान' ग्रंथमालिका निर्माण करण्याचा संकल्प स्वरुपयोग प्रतिष्ठानने प्रारंभ केला आहे. तो निश्चित स्वागतार्ह आहे. गीतेचे अठराही अध्याय स्वामी माधवानंद यांच्याकडून मूर्त स्वरुपात आणून स्वरूपयोग प्रतिष्ठानने आपला संकल्प पूर्णत्त्वास न्यावा व गीताप्रेमींना ज्ञानाची पाणपोई खुली करावी. भगवंताचे अधिष्ठान त्यांच्या कार्यास लाभो ही शुभेच्छा व सदिच्छा. पुढच्या अध्यायाची आम्ही सर्वजण चातकासारखी वाट पहात आहोत.

प्रकाशक - स्वरुपयोग प्रतिष्ठान, ८८५/३ शिवाजीनगर
गल्ली क्र.६, भांडारकर इन्स्टिट्यूट,
हपुणे ४११००४.

प्रथमावृत्ती - २००६, पृष्ठे - २४३, मूल्य - ६० रुपये

**आशा भिडे**

बी/९, विजय अपार्टमेंट
आराधना टॉकीजवळ
ठाणे (प.) ४०० ६०२
दूरध्वनी : २५४१ ०१३४०
मो. ९३२४०४४७६४

# बचत एक महत्त्वपूर्ण गरज - बचतीचे संस्कार

*बचत फक्त पैशांची नसते. जीवनातील लहान सहान बाबींची बचत ही महत्त्वाची असते. त्या दृष्टीने हा संस्कार पालकांनी करायला हवा. - संपादक*

बचतीपासून फायदा होत नाही, असे सांगणारा क्वचितच भेटेल. बचतीपासून फायदा होतोच होतो असे प्रत्येक जण सांगेल व वर असेही सांगेल की, बचतीची सवय अंगी बाणवली पाहिजे. बचतीचा लाभ फार मोठा असतो. तेव्हा ''बचत करा!'' असा अनाहुत सल्ला देणे व उपदेश करणे हा आमचा मोठा गुण आहे. न उगवणाऱ्या बियांची लागवड करीत फिरावयाचे, स्वतःच्या हुशारीची टिमकी वाजवीत रहायचे ही आमची प्रवृत्ती लक्षात घेऊनच "बोले तैसा चाले" त्याची पाऊले वंदण्याची संतांनी तयारी दर्शविली असावी. क्रांतिकारक जन्माला यावा पण तो शेजाऱ्याच्या घरात या तत्त्वानुसारच आपण बचत करण्याचे फायदे दुसऱ्याला पटवून देतो आणि उपदेश करणे म्हणूनच आम्हाला जमत नाही.

दुसऱ्यांना बचत करा असे सांगत हिंडणारे आपण खरोखरच बचत करीत असतो का? जीवनाच्या प्रत्येकच क्षेत्रात अमाप उधळण चाललेली शहरी जीवनात आपण अनुभवतो. ही अमाप उधळपट्टी पाहिली की, ''भारत देस गरीब आहे, गरीबांचा देश आहे'' हा विचार भुसा भरून ठेवलेले एखादे जनावर पहावे, तसा निर्जीव वाटतो. शहरातील कोणत्याही एखाद्या सुखवस्तू घरातून डोकावले तर हा विचार पटल्याखेरीज रहात नाही. केवळ पैसा साठविणे म्हणजे बचत, इतका संकुचित अर्थ बचतीत गृहीत नाही. कोणतीही कृत्रिम, नैसर्गिक ऊर्जा, कोणतेही वाया जाणारे धन यांची काटकसर म्हणजे बचत.

आजच्या संस्कृतीला अनेक संबोधने लावली जातात. कोणाच्या मते ती ज्ञानाची तर कोणाच्या मते ती प्रगतीची संस्कृती असते, तर काही जण दूरदर्शन संस्कृती, भविष्यवादी संस्कृती असा तिचा निर्देश करतात. शहरी जीवनापुरतं बोलायचं झालं तर ती उधळपट्टीचे चित्र असणारी 'हॅपी बर्थ डे' संस्कृती आहे असे मला वाटते. बचत हा एक संस्कार आहे. तो आपल्या मुलांवर करावा याची जाण न ठेवणारे पालक आणि त्यातून सदा माज आल्यासारखे वागणारी पिढी. अपवाद असू शकतील, पण अपवाद आहेत. माजोरेपणाची वृत्ती हा नियम चालला आहे.

मागे एक औषध कंपनीस पत्र लिहून मी "आपल्याच कंपनीच्या रिकाम्या बाटल्या आपण घेणार काय? होकारात्मक उत्तर असेल तर मी त्या आणून देऊ इच्छितो" असे पत्रात लिहिले होते. पत्राचे उत्तर नकारात्मक आले. कदाचित कंपनीला ते 'बिलो डिग्निटी' वाटले असेल. माझा त्यात प्राथमिक विचार होता तो बचतीचा. प्रत्येक कंपनीने असे धोरण स्वीकारले तर रस्त्या रस्त्यात साठणाऱ्या कचऱ्यातील अशा बाटल्या, त्यांच्या काचा कमी होणार नाहीत काय? पण व्यवहाराची चालच वेगळी आहे. शाळेतील एक साधारण बऱ्या (आर्थिक) परिस्थितीतील मित्र मला अजूनही आठवतो. तो (व पर्यायाने त्याच्या सहवासात राहून आम्हीही) लहान वयात ही वर्तमान पत्रातून येणारी हॅंडबिल्स, एका बाजूने कोरी असणारी कॅलेंडरची पाने, बसची एका बाजूने कोरी असणारी तिकिटे जमवू व सुट्टीत या सर्वांच्या छोट्या छोट्या वह्या स्वतः बनवू. वह्या वाण्याच्या दोऱ्याने शिवायच्या. रफ गणिते सोडविणे, घरचा अभ्यास लिहून घेणे, गणिताचा सराव करणे या कामी तो त्या वह्या वापरायच्या. वह्या घेण्याची कुवत नव्हती असे

नाही पण तुमच्या आमच्या - सारखी चांगल्या वह्यांची पाने वाया घालविण्याची वृत्ती नव्हती. तो नेहमी म्हणे, 'कागद किती महाग आहे, आपण वाचवला पाहिजे, शाळेतील हाताने शिवलेल्या वह्या, वर्तमान पत्राच्या कोऱ्या पट्ट्यांचा खूण ठेवण्यासाठी केलेला वापर, वर्तमानपत्रांची वेष्टने घालून स्वतः बनवून लावलेली वह्या, पुस्तकांवरील लेबल्स हे सगळे आजच्या पार्श्वभूमीवर फारच प्रकर्षाने जाणवते आणि मग जाणवते, आज असा बारकाईने विचार करणारे विद्यार्थी अपवाद म्हणून तरी असतील का?

अशीच एक चांगली बचतीची सवय त्या वयात पाळली होती. ती दहा पैसे रोज साठविण्याची. वर्षाचे ३६ रुपये साठवायचे व त्यातून नवीन वर्षाची पुस्तके आणायची. वास्तविक पैसा नव्हता म्हणून हे करावे लागे वगैरे काही नाही. वर्गात एखाद्या शिक्षकाने कल्पना दिली, त्याने झपाटून जायला व्हायचे. ६ वी ते ११वीच्या दरवर्षीच्या पुस्तक खरेदीत हा ३६ रुपयांचा हातभार असे. सुरूवातीला तर ३६ रुपयात दोन्ही - वह्या व पुस्तके येत असत.

घरकामातही हा बचतीच विचार होणे आज महत्त्वपूर्ण आहे. टी. व्ही. च्या छायेत वाढणाऱ्या आजच्या विद्यार्थिनींस भांडी घासणे कमीपणाचे वाटेल; कारण श्रम प्रतिष्ठेच्या वेगळ्याच कल्पनांत ती वाढत असते. पण या भांडी घासण्याच्या उदाहरणावरूनच आपणास जाणवेल की, आपण स्वतः घरकाम करणे किती आवश्यक आहे. चार जणांच्या कुटुंबात १७००/- रुपये घेणारी मोलकरीण फक्त धुणी, भांडी, केर वगैरे करते. अशा दोघेही मिळवणाऱ्या कुटुंबातील बाईशी बोललात तर ती सांगते, एवढं कष्ट करून, नोकरी करून घरातलं काम करायचं म्हणजे ... टू मचच नाही का? घरातलं काम हे नोकरी करायची असेल तर स्वावलंबनाने करावे हे तिला पटणार नाही. कारण मनाला कोठे तरी 'हे हलके काम ...' हा विचार रुजलेला असतो. १२-१३ वर्षांची घरातील मुले व आई-बाप यांची श्रमविभागणी केली तर .. तर त्यांचे किती रूपये वाचतील हा अगदीच ढोबळ विचार झाला, कारण मोलकरीण भांडी घासताना बारकाईने आपण निरीक्षण करा, ती नळ सोडूनच ठेवते. एकीकडे भांड्यांना पावडर लावायचे व दुसरीकडे नळ चालूच या पद्धीतीने रंगात येऊन ती काम (करत नसते तर उरकत असते...) आटोपते. एखादे लहान भांडे आहे तर त्याला किती पावडर लागेल व मोठ्यांना किती लागेल. या बारकाईच्या विचाराचा आचार तिच्या ध्यानीमनी असण्याची गरज नसते. कारण ती 'पाट्या टाकणे' करीत असते. पण हेच काम काही पद्धतीने केले तर पाणी ही अत्यंत आवश्यक गोष्ट वाया जाणार नाही. काटकसरीच्या विचाराच्या आचाराची सवय अंगी बाणून आपण अधिक स्वच्छ व चांगले काम करू; आणि शिवाय स्वावलंबनाची सवय आपण आचरणात आणू ती वेगळीच. पाणी वाचणे ही आज पाणी वाय जात असते त्या प्रत्येक क्षणाची फार मोठी गरज आहे. फक्त या बचतीचे महत्त्व आपल्याला उमजणे महत्त्वाचे आहे.

### पाण्याची उधळपट्टी

घरातील एका साध्या, हलक्या वाटणाऱ्या कामाचे उदाहरण पाहिल्यावर सार्वजनिक उधळपट्टीचेही थोडे अंतर्मुख करायला लावणारे उदाहरण पहाणे उचित ठरेल. जगात उपलब्ध असणाऱ्या एकूण पाणी संचयापैकी ९७% भाग समुद्रात असल्याने ते आपल्या वापराशिवाय आहे. ३ टक्के भागातील २ टक्के भाग पाण्याचे गोठून बर्फ झालेले आहे व राहिलेला १ टक्का पाण्याचा संचय प्राणीमात्रास वापराकरिता उपलब्ध आहे असे आकडे शास्त्रज्ञ सांगतात. या एक टक्का पाण्याचा जास्तीत जास्त वापर करून घेणे ही आजची गरज आहे. पण घरातील एक उदाहरणाप्रमाणे सार्वजनिक जीवनात आपण पाहिलेत तर वेगळे चित्र दिसत नाही ही दुर्दैवाची परिसीमा आहे.

एक साधे उदाहरण कोणत्याही हॉटेलाचे घेऊ. या हॉटेलांमधून पिण्याकरिता दिले जाणारे पाणी हा निरीक्षण विषय केलात तर असे लक्षात येईल की गिऱ्हाईकाला

दिले जाणारे पाणी अगदी कमी प्रमाणात वापरले जाते किंवा तितके ते दिले जाण्याची वास्तविक गरज शून्य असते. केवळ पाणी समोर आणून ठेवले गेले आहे म्हणून ग्लास तोंडाला लावून दोन तीन घोट पिणारे बरेच जण असतात. तो उष्टावलेला ग्लास त्यांनी खाली ठेवताच हॉटेल बॉय येऊन तो ग्लास उचलून नेतो व दुसरा ठेवतो... पुन्हा तेच होते. पाऊण पाऊण ग्लास पाणी असे वाया जात रहाते. पण आपण इतक्या खोलात जाऊन विचार करतोय कशाला? आपण आपल्याला मिळतयं ना ... या विचारात आणि मिळतयं तिथपर्यन्त अशा उधळपट्टी चालू ठेवत असतो. पाणी डोळ्यांना दिसणेही दुर्लभ आहे अशांचे पाणी तरळत असलेले डोळे आम्हाला कधी आठवत नाही कारण चहा बिस्कीटांबरोबर वर्तमानपत्र चघळणाऱ्या आम्हाला ती एक बातमी असते. पण हॉटेलमधून अशा तऱ्हेने वाया जाणारे पाणी वाचले तर ....? स्वतःला आवश्यक असेल तेव्हा आणि आवश्यक असेल तितकेच पाणी पिण्याची सवय याकरिता स्वतःच्या अंगी बाणावी लागेल. कोणत्याही चांगल्या गोष्टी स्वतःपासून करणारे आदर्श विद्यार्थ्यांसमोर उपलब्ध झाल्यास हा वाया न जाऊ देता पाणी वाचविण्यासाठी सक्रिय प्रयत्न होतील. अर्धा ग्लास तहान असणारे पूर्ण ग्लास उष्टावून अर्धे पाणी फेकून देतात तेव्हा अर्ध्या पाण्याचे वाईट वाटते.

हे झालं जेवता खातानाचे, हॉटेलमधले दृश्य, शाळा महाविद्यालये, सिनेमा-नाट्य गृहे, बँका अशा सार्वजनिक वावर असणाऱ्या ठिकाणाचे काय? अगदी पहिली दुसरी पासून ते निवृत्ती पर्यन्तच्या वयातील माणसे अशा ठिकाणी तोटींवर जेवलेले हात धुण्यासाठी जातात तेव्हा निरीक्षण करावे. पाण्याची धार सोडण्याची पद्धत, नळ चालू असताना दात घासत असण्याची पद्धत या सर्व क्रियेत अर्धा लोटी पाण्यात भागेल अशा कामासाठी २-३ लोट्या पाणी सरळ वाया जाते आणि अधिक क्लेशकारक ठरते ते नळ बंद न करता त्यांचे जाणे. ही लहान मोठ्या वयातील माणसे हात धुतात आणि निघून जातात. 'नळ बंद करावा' ही उत्स्फूर्त क्रिया कोणाकडूनही होत नाही. मंगल कार्यालये तर हमखास पहावीत. अर्धा अर्धा दिवस विनाकारण नळ वहात असतो. त्यांतून अशा धेडगुजरी वापरामुळे नळाची तोटी बिघडते... मग काय पहायलाच नको. तोटी दुरुस्त व्हायची म्हणजे मांजराच्या गळ्यात घंटा बांधली जाणे .... ते होईल तेव्हाच खरे. या प्रकारातही अपरिमित नुकसान आपण करीत असतो. कदाचित नकळतही असेल पण म्हणूनच अंतर्मुख होऊन त्याचा विचार केला तर ....?

या असा उधळपट्टीच्या प्रकारांचे बारकाईने निरीक्षण करतो तेव्हा राहून राहून विचार येतो 'आदतसे मजबुर' या सदरात मोडणाऱ्या नमुन्यांना. ''नळ वापरणे - एक शास्त्र'' ''पाणी कसे प्यावे'' अशा क्षुल्लक वाटणाऱ्या विषयांचे बालवयातच शिक्षण द्यावे. भारत हा गरीबांचा देश असल्यानेच ही अशी उधळपट्टी भविष्यात तरी निदान न परवडणारी आहे. वाढती लोकसंख्या, वाढते केंद्रीकरण यातून निर्माण झालेले प्रश्न तर अधिक जटिल आहेत. दोन वेळा जेवायची भ्रांत असणारे कुटुंब आणि कुत्र्याकरिता म्हणून दोन वेळ मटण, दूध आणणारे कुटुंब या शहरात शेजारी शेजारी रहातात. माणसाने हौस म्हणून पाळलेल्या जनावराच्या अन्नाकडे आशाळभूत होऊन पहाणे हे माणसाचे दुर्दैव या शहरी संस्कृतीतच पहायला मिळते. असे गुन्तागुन्तीचे झालेले प्रश्न सोडवताना पाणी ही किती महत्त्वपूर्ण समस्या आहे. याची शहरी माणसाला वेगळी जाण देणे न लगे. पाणी हा ज्वलंत प्रश्न असल्याचे आपण सगळे अनुभवतो, मान्यही करतो पण तत्वशः प्रत्यक्ष व्यवहारात पाणी वाचावे, निदान माझ्या हातून तरी ते वाया जाऊ नये यासाठी काही करतो का याचा अंतर्मुख होऊन मनाला जाब विचारला पाहिजे आणि 'आदतसे मजबूर' या सदरातील आपल्या सवयीही माणसासाठी बदलल्या पाहिजेत तरच "सारे भारतीय माझे बांधव आहेत" याचा खरा साक्षात्कार होऊ शकेल.

**प्रा. मोहन पाठक**
ठाणे

## आचार्य विनोबा भावे यांचे मौलिक विचार:

भारतीय गणतंत्रसाठी आपण अशोकाचिन्ह, बोधचिन्ह म्हणून निवडले आहे. या अशोकचिन्हात अनेक अर्थ दडलेले आहेत. गावी आणि मेंढ्या कळपांनी रहातात कारण त्यांच्यात धैर्याचा अभाव असतो. मेंढ्यांना आपण अहिंसक म्हणू शकत नाही, त्या नुसत्याच भित्र्या असतात. याउलट सिंह धैर्यवान आहे, जंगलचा अनभिषिक्त राजा आहे. परंतु आपल्याच प्रजाजनांची शिकार करुन त्याचा दरारा निर्माण झाला आहे. सिंह धीट परंतु आक्रमक आहे. आक्रमक असल्याने तो एकटा पडतो.

अशोकाने अशा एकट्या रहाणाऱ्या चार सिंहांना एकत्र आणले आणि एका नव्याच सिंहाला अस्तित्व दिले. जो शूर तर आहेच पण त्या बरोबरच प्रेमाच्या बंधनाने इतरांबरोबर बांधला गेला आहे. मेंढ्या कळपात रहातात पण त्यांच्याच धैर्याचा अभाव आहे. सिंहाकडे धैर्य आहे परंतु दुसऱ्यांसाठी प्रेम नाही. जेथे धैर्य आणि प्रेम एकत्र वास करतात, तेथे अहिंसा वास्तव्यास येते आणि अहिंसेची ताकद याच धैर्य आणि प्रेमाच्या युतीत असते.

अशोकचिन्हातील चार सिंह, योध्दा अशोकाचे सन्मार्गी अशोकामध्ये झालेले परिवर्तन दर्शवतात.

प्रत्येक भारतीयाकडे सिंहासारखे धैर्य असावे, परंतु त्याने सिंहासारखे स्वतंत्र न रहाता, एकोप्याने रहावे असे आम्हास वाटते. हीच खरी क्रांती आहे आणि हीच क्रांती ग्रामदान चळवळीत प्रतीत होते.

अनुवाद :

**शुभांगी भावे**

**विद्या गायकवाड**

तृतीय वर्ष विधी महाविद्यालय, ठाणे.

## पुस्तिका 'महती नामस्मरणाची' - एक निवेदन

महती नामस्मरणाची म्हणून एक चांगली पुस्तिका सध्या बाजारात उपलब्ध आहे. पंडित प्रसन्न कुलकर्णी यांनी लिहिलेल्या या पुस्तिकेत नामस्मरणवद्दल बराच उहापोह केलेला आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात देवतेचे केलेले नामस्मरण आपल्याला तारूण कसे नेते, हे पुस्तिका वाचल्यावरच आपल्याला कळेल.

नकारात्मक विचारसरणीतून मुक्त व्हायचे असेल आणि सकारात्मक विचारसरणी मनावर बिंबवायची असेल तर नाम:स्मरणासारखा दुसरा उपाय खचितच नाही. हे पुस्तक वाचल्यावर आपल्याला पदोपदी जाणवते.

नाम:स्मरणामुळे औदासीन्य झटकले जाते. मरगळ दूर होते. माणसाचे विकार लोप पावतात. अविचारीपणा कमी होतो. माणूस विचारी बनतो. दरिद्री जीवनाला ग्रहण लागते. व समृध्द विचारांचे तारे जीवनात लुकलुकायला लागतात. नाम:स्मरण ही एक ईश्वरी पुंजी आहे.

नामस्मरणाचे रोपटे आपल्या जीवनात लावून त्याचा प्रत्येकाने वटवृक्ष करणे आवश्यक आहे. का? ते ही पुस्तिका वाचून समजवून घ्या. ही पुस्तिका केवळ २५ रु. विक्रीस उपलब्ध आहे. तरी अध्यात्माची व या विषयाची आवड असणाऱ्यांना ही पुस्तिका या पत्तावर विकत मिळेल.

**पंडीत प्रसन्न कुलकर्णी**

'निसर्ग' बिल्डींग नं. ९ कुलकर्णी

३ रा माळा, ब्लॉक नं. ३०२,

मनीषा नगर, कळवा,

ठाणे.

# "ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण"

संगणकीकरण हा आजकालचा परवलीचा शब्द झाला आहे. माहिती तंत्रज्ञान हे झपाट्याने विकसित होणारे तंत्रज्ञान आहे. या दोन्हींशी ग्रंथालयाचा जवळचा संबंध आहे. यांच्या वापराबाबतही ग्रंथालयांनी या दोन्हींना प्राधन्यता दिलेली आहे.

मात्र वापर करण्याच्या पद्धतीबाबत मतभिन्नता आढळते. तसेच अनेक पर्यायाच्या उपलब्धतेमुळे गोंधळात तेवढी भर पडते. यावर इंग्रजी भाषेतील पुस्तकांची मात्रा लागू पडते. पण त्यालाही मर्यादा आहेत.

अशा स्थितीत संगणीकरणविषयक अनेक प्रश्नांची उत्तरे देणारा डॉ. द. ना. फडके लिखित 'ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण' हा ग्रंथ नुकताच प्रकाशित झाला आहे. डॉ. द. ना. फडके हे सेंट्रल लायब्ररी, भारतीय प्रौद्योगिकी संस्था, मुंबई येथे वरिष्ठ सहाय्यक ग्रंथपाल म्हणून कार्यरत आहेत. ग्रंथालयशास्त्रात 'भौगोलिक माहितीचा ग्रंथालयात वापर' या विषयावर प्रबंध सादर करून त्यांनी पुणे विद्यापीठातून डॉक्टरेट मिळवली आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, अलगप्पा विद्यापीठ, भारती विद्यापीठ यांच्यासाठी अभ्यासक्रम निर्मिती, पाठ्यपुस्तक लेखन व संमत्रण कार्यात त्यांचा मोठा सहभाग आहे. एम. फिल, पीएच. डी च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक म्हणूनही त्यांचा आधार लाभत आहे. शिकवण्याचा प्रत्यक्ष अनुभव, ग्रंथालय संगणकीकरणातील सहभाग, लेखन सहकार्य, तसेच नवनव्या उपक्रमांचे आयोजन असा दीर्घ अनुभव असलेल्या विद्यार्थी प्रिय डॉ. द. ना. फडके यांचे लेखन हे या ग्रंथाला निराळीच उंची प्राप्त करून देते. म्हणूनच हा मातृभाषेतील व या विषयाचा सर्व अंगांनी ऊहापोह करणारा पहिलाच ग्रंथ आहे, असे म्हटल्यास ते वावगे ठरू नये.

ग्रंथालयात संगणकीकरण करताना ते जसे जमले तसे करत गेले तर असंख्य अडचणी उद्भवून अपेक्षित परिणाम साध्य होत नाही. यासाठी त्याची पद्धतशीरपणे रचना आखायला हवी. त्यादृष्टीने सर्व प्रकारची परिपूर्ण माहिती उदाहरणांसह सोप्या भाषेत या ग्रंथात दिली आहे.

मुळात संगणकीकरण हा शब्द आधुनिकीकरणास समानार्थी असल्याप्रमाणे वापरला जातो. त्यातील सूक्ष्म फरक ग्रंथाच्या अवलोकनाने लक्षात येतो. या दोन्हींचे महत्त्व दर्शविणारे दोन विभाग या ग्रंथात आहेत. पहिल्या विभागातील सात व दुसऱ्या विभागातील तीन अशी एकूण दहा प्रकरणे ग्रंथालय संगणकीकरणाशी तर दुसऱ्या विभागातील तीन प्रकरणे- आधुनिकीकरणाशी निगडित आहेत.

पहिल्या विभागात संगणकाची व्याख्या, पार्श्वभूमी तांत्रिक माहिती, आज्ञावली, बारकोड तंत्रज्ञान, डेटाबेस, संगणकीकरणाचे फायदे, पद्धतींचा (systems) विकास, सोल व इतर सॉफ्टवेआर, संगणकीकृत कार्ये, नेटवर्कींग, इंटरनेट, संकेतस्थळ निर्मिती, डिजिटल ग्रंथालय अशा अनेक विषयांचा परामर्श घेतला आहे.

दुसऱ्या विभागात आधुनिकीकरणाशी निगडित सर्व मूलभूत गोष्टींची चर्चा करण्यात आली आहे. त्यात ग्रंथालय सुरक्षितता, ई-गव्हर्नन्समध्ये वापर, त्यासाठी उपयुक्त आज्ञावली अशा विषयांशी संबंधित अशा 'माहिती साक्षरता' या घटकाचीही सखोल ओळख करून देण्यात आली आहे. माहिती साक्षरता, त्याची व्याख्या, अर्थ, महत्त्व, उपयोग यावर प्रकाश टाकला आहे. तसेच ACRL

(पान क्रमांक ४०)

# असे साजरे केले - अमृत महोत्सवी वर्ष

*डॉ. बेडेकर विद्यामंदिर या आमच्या शाळेच्या पूर्व प्राथमिक विभागाचे हे अमृत महोत्सवी वर्ष त्यानिमित्ताने हा लेख पुन: प्रकाशित करत आहोत. संपादक*

''वर्ष हे अमृत महोत्सवाचे आनंदाच्या साम्राज्याचे.''

अन्न, वस्त्र, निवाऱ्या बरोबर शिक्षण ही सुद्धा माणसाची मुलभूत गरज आहे. ही काळाची पाले ओळखणाऱ्या द्रष्ट्या व समाजहितचिंतकांनी अत्यंत तळमळीने व अपार मानवतावादी दृष्टीकोनातून उभी केलेली ही डॉ. बेडेकर विद्यामंदिर शाळा! तिला आता ७५ पूर्ण होत आहेत.

शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कल्याणी वाघरेबाई यांनी हे अमृत महोत्सवी वर्ष आनंदात उत्साहात व धुमधडाक्यात साजरे करण्याचे सर्व सहकाऱ्यांना सुचीत करुन त्याप्रमाणे नियोजन करण्यात आले. अमृत महोत्सवी वर्ष विविध कार्यक्रम विशेपत्वाने राबवून उत्साहपूर्ण वातावरणात साजरे करण्यात आले.

शाळेची स्थापना गुढीपाडव्याच्या दिवशी झाली होती. त्यामुळे गुढीपाडव्याच्या शुभदिनी अमृत महोत्सवी वर्षाची सुरुवात करण्यात आली. कार्यारंभी ईश्वर पूजा, प्रार्थना करण्याची आपली सांस्कृतिक परंपरा आहे. त्यानुसार श्री गणेशपूजन व उदकशांती करण्यात आली. उच्च स्वरातील वेदमंत्रांनी शाळेतील वातावरण मंत्रमुग्ध झाले होते. मंत्रोच्चार, होमहवन इ. मुळे शाळेला भक्तीमय गुरुकुलाचे स्वरुप प्राप्त झाले होते. या कार्यक्रमाचे पौरहित्य श्री. अतुल गांगल व त्यांचे सहकारी यांनी केले. तसेच आपल्या शाळेच्या ज्येष्ठ शिक्षिका सौ. विजया भंडारे व त्यांचे पती श्री. तानाजी भंडारे यांच्या शुभहस्ते पूजन करण्यात आले. कार्यक्रमास मा. श्री सुभाष काळे, शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व सेवानिवृत्त मुख्याध्यापिका व शिक्षक उपस्थित होते. उपस्थितांनी ईश्वराची प्रार्थना करुन शाळेच्या प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या.

<u>१२ जुन २००६</u> रोजी उन्हाळी सुटी संपून शाळा सुरु झाली. या दिवशी इ. १ लीच्या वर्गात आलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्याची शाळेची पद्धत आहे. वर्गावर्गातून संबंधित शिक्षकांनी मुलांची ओळख करुन घेतली. विद्यार्थ्यांना शाळेविषयी, शिक्षकांविषयी व अभ्यासाविषयी आवड, आदर, प्रेम निर्माण व्हावे या दृष्टीने शिखकांनी विद्यार्थ्यांशी हितगुज केले. नंतर त्यांना चॉकलेटस् देण्यात आली.

तसेच या दिवशी सर्व शिक्षण मोहिमे अंतर्गत शासनातर्फे पाठ्यपुस्तकांचे मोफत वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून ठा.म.न.पा. च्या सेवानिवृत्त पर्यवेक्षिका सौ. शरयू पाळंदे आणि ठाणे शहरातील समाजसेवक श्री. बाळ पूर्णेकर यांना निमंत्रित केले होते. पाहुण्यांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना पुस्तकाचे वाटप करण्यात आहे. 'विद्यार्थ्यांनी शासनाने दिलेल्या सुविधांचा चांगला उपयोग करुन आपली प्रगती करुन घ्यावी. शाळेचे शिक्षकांचे व आई-वडिलांचे नाव उज्वल करावे' असा संदेश प्रमुख पाहुण्या सौ. शरयू पाळंदे यांनी विद्यार्थ्यांना दिला.

<u>३० जुन २००६</u> या दिवशी पालक-शिक्षक सभा आयोजित करण्यात आली होती. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. वाघरेबाई यांनी शाळेच्या पूर्ण शैक्षणिक वर्षाचे विविध

शैक्षणिक उपक्रम परीक्षा, विद्यार्थी विकास इ. गोष्टी सविस्तरपणे सांगितल्या. तसेच अमृतमहोत्सव व त्याबाबतच्या नियोजित कार्यक्रमात पालकांना कल्पना दिली तसेच पालकांच्या विविध अडचणी व शंकाचे समाधान केले. बहुसंख्य पालक सभेस उपस्थित होते.

६ जुलै २००६ आषाढी एकादशी - महाराष्ट्राचे आराध्य दैवत व संतांचे माहेरघर असलेला पंढरपूरचा विठूराजा. अद्वैत व समत्व यांची प्रेरणा या पांडुरंगाकडूनच घेऊन तत्कालीन संतांनी विषमता, अज्ञान, जातीयता, धर्मांधता दूर करण्याच्या हेतूने वारी, दिंडी असे उपक्रम सुरु केले. हा सांस्कृतिक वारसा विद्यार्थ्यांपर्यंत पोचावा म्हणून इ. १ ली ते ४ थीचे विद्यार्थी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते. परंपरेनुसार पालखी सजवून त्यात विठ्ठल रखुमाईचा फोटो, ज्ञानेश्वर महाराज व तुकाराम महाराजांचा फोटो ठेवून त्यांची मनोभावे पूजा केली व ज्ञानपंढरीचे वारकरी ही पालखी खांद्यावर ठेवून नाचत नाचत दिंडीत सहभागी झाले होते. मुली नऊवारी साडया नेसून डोक्यावर तुळशीवृंदावन घेऊन विठ्ठलाच्या नामगजरात नाचत होत्या. सगळीकडे उत्साहाचे उधाण आले होते. अवघी ज्ञानपंढरी गुलाल बुक्का व विठ्ठल नामात रंगून गेली होती. मध्यभागी विठ्ठल रखुमाईच्या वेशातील मुले सजवलेल्या टेबलावर उभी केली होती. दिंडी वाजत गाजत शेवटी या विठ्ठल रखुमाई जवळ आली व सर्वांनी त्यांना मनोभावे नमस्कार केला. मा. मुख्या. सौ. वाघरेबाईंनी विठ्ठल रखुमाईची पूजा केली. नंतर आरत्या म्हणण्यात आल्या. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. दिंडीचा प्रसाद म्हणून साखर फुटाणे दिले व सर्व बाल वारकरी उत्साही मनाने घरी परतले.

२१ जुलै २००६ गुरुपौर्णिमा - गुरुविषयी आदर व्यक्त करण्याचा दिवस. भारतीय संस्कृतीतील एक महत्वाचा दिवस. शाळेत विशेषत्वाने साजरा करण्यात आला. कार्यक्रमास वि. प्र. मंडळाचे ज्येष्ठ सदस्य मा. श्री. करंदीकरसर, मंडळाचे सदस्य श्री. दिलीप जोशीसर व नियोजित प्रमुख पाहुणे श्री. वि. ह. भूमकर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्जवलन झाले. प्रथम इ. १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणात गुरुंचे महत्त्व आणि गुरु-शिष्यांच्या गोष्टी सांगितल्या. प्रमुख पाहुणे श्री. भूमकर यांनी मुलांना पत्त्यांचे जादूचे प्रयोग दाखवून मुलांचे मनोरंजन केले. ''सांगकाम्या नारायणाची'' गोष्ट सांगून ऐकून घ्यावे पण स्वतः योग्य निर्णय घेऊन वागावे असा संदेश दिला. वन्देमातरम् या राष्ट्रगीत गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

२४ जुलै २००६ दिव्यांची अवस - आषाढ अमावस्या ही दिव्यांची अवस म्हणून साजरी केली जाते. या दिवशी घासून पुसून स्वच्छ केलेले विविध प्रकारचे तांब्या पितळेचे दिवे, काचेचे दिवे, आधुनिक दिवे कलात्मक पध्दतीने टेबलावर मांडण्यात आले होते. सर्व दिवे प्रज्वलित करुन मा. मुख्याध्यापिका सौ. वाघरेबाईंनी दिव्यांची मनोभावे पूजा केली. कार्यक्रमात इ. १ ली ते इ. ४ थी चे विद्यार्थी उपस्थित होते. सर्व मुलांनी रांगेने दिव्यांचे दर्शन घेऊन नमस्कार केला. सर्व मुलांना प्रसाद वाटण्यात आला.

१ ऑगस्ट २००६ - लोकमान्य टिळक पुण्यतिथी मा. मुख्याध्यापिका सौ. वाघरेबाई यांच्या हस्ते लोकमान्य टिळकांच्या तसबिरीस पुष्पहार घालण्यात आला. वर्गावर्गातून विद्यार्थ्यांनी टिळकांविषयी भाषणे केली. वर्गशिक्षकांनी मुलांना टिळक पुण्यतिथीविषयी माहिती दिली.

८ ऑगस्ट २००६ नारळी पौर्णिमा / रक्षाबंधन - वर्गावर्गातून शिक्षकांनी नारळी पौर्णिमा व रक्षाबंधनाचे महत्त्व सांगितले. केवळ बहिणीनेच भावाला राखी बांधून तिचे रक्षण भावे करावे एवढा संकूचित अर्थ न घेता सर्वांनी एकमेकांना राख्या बांधून सदैव एकमेकांचे रक्षण करण्याची भावना निर्माण व्हावी या हेतूने सर्व मुली व मुलांना

शाळेकडून राख्या दिल्या जातात. मुले मुली एकमेकांना राख्या बांधतात तसेच या दिवशी मुलांना गोड खाऊ देण्यात येतो.

११ ऑगस्ट २००६ श्रावणी शुक्रवार - सणांचा व व्रतवैकल्यांचा श्रावण महिना यातील प्रत्येक दिवसांच विशेष महत्त्व असतं. त्यापैकी एक श्रावणी शुक्रवार. आपल्या मुलाला उत्तम आयुष्य, यश, किर्ती, संपत्ती व आरोग्य प्राप्त व्हावे यासाठी घरोघरी प्रत्येक आई ईश्वरास प्रार्थना करते. त्याचप्रमाणे शाळेतही हा कार्यक्रम साजरा करण्यात आला. शुक्रवारची कहाणी मुलांना सांगण्यात आली. जीवंतिका पूजन केले. मुलांना चणे व बुंदीचा लाडू वाटण्यात आले.

१५ ऑगस्ट २००६ दरवर्षी उत्साहाने साजरा होणारा आपल्या सण स्वातंत्र्यदिन यावर्षीही ठाणे महाविद्यालयाच्या परिसरात उत्साहाने पार पडला. संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. करंदीकर सर यांच्या हस्ते झेंडा फडकवण्यात आला. सामुहिक स्वरात राष्ट्रगीत झाले. वि. प्र. मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी सर्व विद्यार्थ्यांना प्रतिज्ञा सांगितली. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर गीते सादर केली. स्काऊटगाईड, एन.सी.सी. विद्यार्थ्यांच्या विशेष प्राविण्याबद्दल पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम करण्यात आला.

नागपंचमी - पारंपारिक पध्दतीने मातीचा नाग तयार करुन त्याची चौरंगावर स्थापना करुन त्याची मुख्याध्यापिका सौ. वाघरेबाईंनी पूजा केली. नागपंचमीची माहिती सांगून मुलांना प्रसाद लाह्या वाटल्या.

पोळा - शेती प्रधान देशात बैलाला अनन्य साधारण महत्त्व आहे. तो वर्षभर शेतात काम करतो व त्याच्या सहकार्यामुळे आपणास पुरेसे अन्न मिळते. त्यांनी आपल्यासाठी केलेल्या कष्टाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पोळा हा सण साजरा केला जातो. या दिवशी पोळा सणाचे महत्त्व व माहिती बाईंनी सांगितली.

२७ ऑगस्ट २००६ श्री गणेशोत्सव - भाद्रपद महिन्यातील गणेशोत्सव दरवर्षी आपल्याकडे साजरा केला जातो. श्री. बोर्डीकर दरवर्षी सेवा म्हणून शाळेसाठी गणेशमूर्ती अल्प मूल्यात देतात.

शनिवार दि. २६ / ८/ २००६ रोजी शाळेच्या सर्व विभागाचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी या सर्वांच्या उपस्थितीत लेझीम व बॅण्डच्या तालावर वाजत गाजत श्री गणेशमूर्ती आणण्यात आली. मुख्याध्यापिका सौ. वाघरेबाई यांनी पारंपारिक पध्दतीने श्री गणेशाचे स्वागत केले. सुशोभित मखरात श्री गणेशाची स्थापना केली. रविवार दि. २७ / ८ /२००६ रोजी माध्यमिक विभागातील चि. ओमकार गोखले याच्या हस्ते श्री गणेशाची यथासांग पूजा करण्यात सहकार्य केले. श्री. सुरेश पवार व सौ. विद्या पवार यांनी आपल्या घरचा गणपती समजून गणेशोत्सव साजरा करण्यात सहकार्य केले. श्रींना मोदकांचा नैवेद्य दाखवण्यात आला. उपस्थितांनी टाळ मृदुंगाच्या तालावर सुस्वरात आरत्या म्हटल्या. इ. ४ थीच्या विद्यार्थ्यांनी श्री समोर गणपती अथर्वशीर्ष म्हटले. रितीप्रमाणे सकाळ संध्याकाळ श्री गजाननाची यथाशक्ती सेवा करण्यात आली. गणेशोत्सवासाठी श्री. वैद्य सरांचे मार्गदर्शन लाभले.

सोमवार दि. २८ / ८ / २००६ रोजी संध्याकाळी पूजा आरती करुन वाजत गाजत श्रींची मिरवणूक काढली. दीड दिवसाच्या पाहूण्याचे तलावात विसर्जन करण्यात आले.

५ सप्टेंबर - शिक्षक दिन २००६ विद्यालंकार सभागृहात शिक्षक दिनाचा कार्यक्रम पार पाडण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान वि.प्र. मंडळाचे श्री. करंदीकरसर यांनी भूषविले तर प्रमुख पाहुणे श्री. वि.ह. भूमकर यांना निमंत्रित करण्यात आले होते. शिक्षक कसा असावा याबाबतचे स्वानुभवाचे उत्तम विचार त्यांनी मांडले. वीस

वर्ष सेवाकाल पूर्ण झालेल्या शिक्षकांचा सन्मान ह्या दिवशी करण्यात येतो. ह्या वर्षी सौ. घोरपडेबाई, सौ. कटकेबाई व सौ. फिरकेबाई यांना पुष्पगुच्छ व मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

२५ सप्टेंबर - शारदोत्सव २५ सप्टेंबर पासून दहा दिवस शारदोत्सव साजरा करण्यात आला. पहिल्या दिवशी मुख्याध्यापिका सौ. वायरेबाई यांच्या हस्ते सरस्वतीपूजन करण्यात आले. रोज सकाळ संध्याकाळ श्री शारदेची पूजा व आरती करण्यात आली व मुलांना प्रसाद वाटण्यात आला. शारदोत्सवाच्या निमित्ताने शाळेत वक्तृत्व, निबंध, रांगोळी, स्मरणशक्ती, चित्रकला इ. स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. शाळेतील अनेक विद्यार्थी यात सहभागी झाले होते. दसऱ्याच्या दिवशी पाटीपूजन करुन रितीप्रमाणे श्री सरस्वतीमातेची पूजा प्रार्थना व आरती करण्यात आली. शाळेतील सर्व मुले मुली व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यात सहभागी झाले होते. शेवटी प्रसाद म्हणून पेढे वाटण्यात आले.

२ ऑक्टोबर - गांधी जयंती या दिवशी सौ. भंडारेबाई यांच्या हस्ते महात्मा गांधींच्या फोटोला पुष्पहार घालण्यात आला. वर्गावर्गातून शिक्षकांनी गांधीविषयी माहिती दिली. मुलांनीही गांधीजी विषयी भाषणे केली.

१४ नोव्हेंबर या दिवशी बालदिन साजरा करण्यात आला. सौ. रजपूतबाई यांच्या हस्ते पं. जवाहरलाल नेहरुंच्या फोटोला पुष्पहार घालण्यात आला. मुलांना बालदिन विषयी थोडक्यात माहिती दिली. या दिवशी बालदिनानिमित्त स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ह्या स्पर्धेत कु. प्रणिता काळभोर हिचा निबंध उत्कृष्ट ठरला.

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही शाळेच्या शैक्षणिक सहली आयोजित करण्यात आल्या होत्या. या वर्षी अंबरनाथ येथील शांतीसागर रिसॉर्ट येथे सहल नेण्यात आली. बहुसंख्य विद्यार्थी सहलीत सहभागी झाले. 'शांती सागर' नावाप्रमाणे शांत व निसर्गरम्य वातावरणात मुले खूप रमली होती. खाण्यापिण्याची चंगळ, विविध खेळ, यात मुले अगदी दंग झाली होती.

स्नेहसंमलेन आनंदाची उधळण करणारा हा कार्यक्रम यावर्षी विशेषत्वाने साजरा झाला. दि. १७/१२/०६ या दिवशी माजी विद्यार्थ्यांच्या 'सांस्कृतिक कार्यक्रमाचे' आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास सर्व पालक विद्यार्थी, आजी माजी शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमात श्री. सुनिल मोरे यांच्या वाद्यवृंदातून अनेक नव्या जुन्या गाण्यांच्या श्रवणांचा आस्वाद श्रोत्यांनी घेतला. कु. प्रिती निमकर, कु. प्रिया निमकर, कु. पल्लवी मोरे या माजी विद्यार्थीनी सहभागी झाल्या होत्या. कु. गौरी ठाकूर, कु. पार्वती निवंगी यांनी उत्तम नृत्ये सादर केली. कु. दावके व सहकारी मंडळींनी लोकनृत्ये सादर केली.

दि. १८/१२/०६ रोजी शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रम झाला. कार्यक्रमास वि. प्र. मंडळाचे ज्येष्ठ सदस्य श्री. करंदीकरसर माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. केळकरबाई पूर्वप्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. वैद्यबाई माजी मुख्याध्यापिका, सौ. नलिनी जोशी नियोजित प्रमुख पाहुणे मा. मेजर सुभाष विद्यार्थ्यांशी कसे वागावे याबाबत आपले विचार उपस्थितांसमोर मांडले. त्यानंतर उत्साहपूर्ण वातावरणात श्री. गावंडसर व श्री. करंदीकरसर यांच्या हस्ते गुणवान विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. नंतर इ. १ली ते इ. ४थीच्या विद्यार्थ्यांनी ठाणे शहरातील विविध जातीधर्म, पंथातील विविध नृत्य प्रकार सादर केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. ठाणेकर बाई यांनी केले.

दि. २१/१/०७ या दिवशी खास पालकांसाठी पालक-बालक समस्या, त्याबाबत समाधान व संस्कार म्हणजे काय? त्यांचे महत्त्व व ते कसे करावेत हे सांगण्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित केले होते. शाळेच्या माजी

विद्यार्थीनी बालमानसशास्त्र व प्रसुतीतज्ज्ञ सौ. उल्का नातू यांना या दिवशी मकर संक्रांती निमित्त उपस्थित स्त्री पालकांना हळदी कुंकू, पुष्प व सर्वांना तिळगूळ वाटण्यात आला. डॉ. सौ. उल्का नातू यांनी पालकांच्या मनातील अनेक प्रश्नांची उत्तरे दिली. बालक हे केंद्र मानून त्याचा सर्वांगिण विकास व्हावा म्हणून पालक शिक्षक व समाज यांनी काय भूमिका असावी याबाबत त्यांनी आपले विचार मांडले. या सभेत बहुसंख्य पालक हजर होते.

दि. २३/१/०७ या दिवशी मकर संक्रांतीच्या सणाबाबत मुलांना माहिती व्हावी या हेतूने शाळेत परंपरेनुसार सुगडाची पूजा केली. विद्यार्थ्यांना मकर संक्रांतीविषयी माहिती सांगितली. सर्व मुलामुलींना तिळगूळ वाटण्यात आला. नंतर शाळेच्या सर्व प्राथमिक, पूर्व प्राथमिकच्या शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना तिळगूळ वाटण्यात आला.

यावर्षी अमृत महोत्सवाच्या निमित्ताने दि. २४/१/०७ रोजी शाळेतील वि. प्र. मंडळाचे सदस्य सर्व विद्यार्थी आजी-माजी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना भोजन देण्यात आले. यादिवशी भारतीय बैठकीवर बसून सर्वांनी आनंदाने सहभोजन केले.

२५/१/०७ या दिवशी वार्षिक क्रिडा पारितोषिक वितरण समारंभ करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे प्रमुख पूर्व प्राथमिक विभागाच्या सौ. विदुला वैद्य व माजी शिक्षिका श्रीम. कृष्णा धोंगडे यांना आमंत्रित केले होते. पाहुण्यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. पाहुण्यांनी आपल्या भाषणातून खेळाचे महत्त्व सांगून यशस्वी करणाऱ्या पालकांचाही पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

२६ जानेवारी दर वर्षीप्रमाणे या वर्षीही ठाणे महाविद्यालय परिसरात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. मा. डॉ. श्री. विजय बेडेकर यांनी सर्वांना प्रतिज्ञा सांगितली. स्काऊट गाईड, एन.सी.सी. मध्ये विशेष कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. त्यानंतर वि. प्र. मंडळाच्या विविध विभागातील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

यावर्षी शाळेला परदेशी पाहुण्यांनी भेट दिली. त्यानिमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. परदेशी पाहुण्यांमध्ये आपल्या सांस्कृतिक, शैक्षणिक गोष्टींबाबत उत्सुकता व आदर दिसून येत होता.

यावर्षी जागतिक महिला दिननिमित्त ठाणे शहरातील समाज सेवकांकडून मा. मुख्याध्यापिका सौ. वाघरे बाई यांचा सत्कार करण्यात आला. आमच्या शाळेच्या शिक्षिका सौ. विजया भंडारे व सौ. वैदेही गांगल यांनी वर्षभर ठाणे शहरातील प्राथमिक शिक्षकांसाठी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून काम केले.

गुढीपाडव्या निमित्त सर्व विद्यार्थ्यांनी पाटीपूजन केले. सर्वांना पेढ्यांचा प्रसाद वाटण्यात आला. कु. अंकिता दुधे ही आमची चिमुरडी मुलगी मलेशियात जाऊन कराटे ओपन चॅम्पियनशिपमध्ये रौप्य पदक पटकावून आली.

आमची आदर्श विद्यार्थी कु. प्रणिता काळभोर हिला मावळी मंडळाने आयोजित केलेल्या वक्तृत्व स्पर्धेत उत्कृष्ट वक्तृत्वाचे पारितोषिक मिळाले.

कु. ऐश्वर्या राणे या चिमुकल्या मुलीस मुग्धा चिटणीस कथा-कथन स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे बक्षिस मिळाले. ह्या विद्यार्थ्यांनी अमृत महोत्सवानिमित्त शाळेला दिलेली ही अमूल्य अशी भेट होय.

आमच्या शाळेतील कर्मचारी सौ. शकुंतला जगताप व श्रीम. कला गायकवाड यांचे वेळोवेळी आम्हांला उत्तम सहाकार्य लाभले.

**सौ. ललिता फिरके, सौ. कांचन मोहिते**
**सौ. रश्मी धर्माधिकारी,**

(अमृत महोत्सवी स्मरणिकेवरुन साभार)

# परिसर वार्ता

## डॉ.बेडेकर विद्या मंदिर पूर्व प्राथमिक विभाग

### शिक्षण क्षेत्राचे पावित्र्य राखले गेले पाहिजे.

'शिक्षण क्षेत्र हे पवित्र क्षेत्र आहे. त्याचे पावित्र्य राखले गेले पाहिजे. परंतु आज या देशात जो सुंदोपसुंदो माजली आहे ते पाहिल्यावर मन विषण्ण होते' असे निराशाजनक उद्‌गार ज्येष्ठ लेखक व प्रवचनकार डॉ. सच्चिदानंद शेवडे यांनी डॉ. बेडेकर विद्यामंदिर, प्राथमिक विभागाच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभात काढले. अध्यक्षस्थानी विद्या प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ सदस्य श्री. वि. उर्फ अण्णा करंदीकर होते.

आपला मुद्दा पटवून देताना डॉ. सच्चिदानंद शेवडे म्हणाले की, 'पुरोगामी महाराष्ट्रात लैंगिक शिक्षण द्यावे की नाही याबाबत वादविवाद चालू आहेत. कधीही कोणतेही जी. आर. निघतात व शिक्षणक्षेत्राला लागू होतात. अभ्यास न करता असे जी. आर. निघतात. ज्या वयात मुलांना 'कराग्रे वसते लक्ष्मी, करमध्ये सरस्वती' हे शिकवताना त्यामागची पार्श्वभूमी मुलांना समजावून सांगायची असते. मूळात ती पार्श्वभूमी शिक्षकांना माहित पाहिजे तरच ते शिक्षक मुलांना समजावून सांगतिल. किती असे शिक्षक आहेत की त्यांना पार्श्वभूमी माहित आहे. अशा परिस्थितीत मुलांना लैंगिक शिक्षण देणे हे कितपत योग्य आहे? ज्या वयात चांगले संस्कार मुलांवरती झाले तर मुले वाममार्गाला जाणार नाहीत.' लैंगिक शिक्षणाऐवजी सैनिकी शिक्षण द्या असे आग्रही प्रतिपादन त्यांनी केले.

झाडूला पाय लागला तर नमस्कार का करायचा हे आईवडिलांनी, शिक्षकांनी मुलांना सांगायला पाहिजे. बाल्यावस्थेतच मुलांवरती चांगले संस्कार झाले तरच ते भावी आयुष्यात कर्तबगार बनतात असे सरतेशेवटी डॉ. शेवडे आपल्या ओजस्वी भाषणात म्हणाले.

डॉ. बेडेकर विद्यामंदिर प्राथमिक विभागाची चाललेली कौतुकास्पद वाटचाल ही खरोखरच कौतुकास्पद आहे. आज ही शाळा अमृत महोत्सव साजरा करीत आहे, त्यामागे संस्थेच्या आजी-माजी सदस्यांचा, आजी-माजी शिक्षकांचा, आजी-माजी विद्यार्थ्यांचा वाटा आहे. त्या सर्वांना मी धन्यवाद देतो असे संस्थेचे माजी कार्यवाह मा. ना. पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले.

अमृतमहोत्सवी वर्षात शाळेने विविध सांस्कृतिक, आध्यत्मिक कार्यक्रम वर्षभरात सादर केले ते मुद्देसूदपणे मुख्याध्यापिका सौ. कल्याणी वाघरे यांनी आपल्या भाषणात सांगितले.

संस्थेने कसा खडतर प्रवास केला हा इतिहास संस्थेचे ज्येष्ठ सदस्य व सांगता समारंभाचे अध्यक्ष श्री. वि. करंदीकर यांनी कथन केले. शाळेच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त स्नेहदीप या स्मरणिकेचे प्रकाशन डॉ. सच्चिदानंद शेवडे यांच्या हस्ते या प्रसंगी झाले.

त्याचप्रमाणे श्रीमती प्रमिला नेरॉय, सौ. नलिनी जोशी, सौ. स्मिता महाडिक, श्रीमती शालिनी कंटक, सौ. सुलभा दांडेकर, श्रीमती अनुराधा मळेकर या माजी मुख्याध्यापिकांचा तसेच प्र. ग. वैद्य सर, संस्थेचे ज्येष्ठ व माजी सदस्य काशिनाथ मालसुरे यांचा सत्कार डॉ. सच्चिदानंद शेवडे यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मकरंद जोशी यांनी केले.

## डॉ.बेडेकर विद्या मंदिर माध्यमिक विभाग

शनिवार १०/३/०७ रोजी इ. ८वी च्या विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी डॉ. उल्हास वाघ यांचे 'शालेय किशोरवस्था' आणि जीवन कौशल्ये या विषयावर प्रबोधनपर व्याख्यान आयोजित केले.

१३ ते १६ डिसेंबर २००६ रोजी भोर येथे झालेल्या स्काऊट-गाईडच्या 'राज्य पुरस्कार' परीक्षेत आपल्या शाळेतील पुढील विद्यार्थीनी उत्तीर्ण झाल्या.

१. टावरे हर्षना पंढरीनाथ

२. परूळेकर प्रियांका प्रसाद

३. हिंगे सोनाली भानुदास

४. कांबळे मिताली मुकिंदा

५. प्रभु माधुरी शरद

मार्गदर्शक शिक्षक - कु. आशालता लोखंडे आणि श्री. प्रकाश पांचाळ

नवभारत राष्ट्रीय ज्ञानपीठ द्वारा 'मराठी प्रविण परीक्षा' ३० डिसेंबर २००६ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर परीक्षेत इ. ६वी तील ४४ विद्यार्थी बसले होते. निकाल १००% लागला. सावंत ओंकार सोमा या विद्यार्थ्यांची 'आदर्श विद्यार्थी पुरस्कार' म्हणून निवड करण्यात आली. पुरस्काराचे स्वरूप गोल्डमेडल व प्रशस्ती पत्रक असे आहे.

मार्गदर्शक शिक्षिका सौ. संगिता शिंगाडे.

२१ फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी ०७ या कालावधीत १२ वी ची बोर्डाची परीक्षा व १३ मार्च ते २९ मार्च ०७ या कालावधीत १० वी बोर्डाची परीक्षा आपल्या शाळेत अत्यंत शिस्तबद्ध व व्यवस्थितरित्या पार पडली.

**सीडॉक संगणक परीक्षा १००%**

| | |
|---|---|
| लेव्हल १ परीक्षेला बसलेले विद्यार्थी | १७ |
| उत्तीर्ण झालेले विद्यार्थी | १७ |
| **प्रथम श्रेणीतील एकूण विद्यार्थी** | **०८** |
| लेव्हल २ परीक्षेला बसलेले विद्यार्थी | १० |
| उत्तीर्ण झालेले विद्यार्थी | १० |
| **प्रथम श्रेणीतील एकूण विद्यार्थी** | **०५** |

## सौ. आनंदीबाई जोशी विद्यालय

**डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा - २००८ चा निकालः**

| | |
|---|---|
| १) कु. अमित पाटणकर | ६वी व |
| २) कु. मृण्मयी ओगळेकर | ६ वी ब |
| ३) कु. साहिल नाती | ६ वी क |
| ४) कु. सुरभि गोखले | ९ वी क |
| ५) कु. ऋचा कारखानीस | ९ वी अ |

**गणित प्रज्ञा परीक्षेचा निकाल (२००७)**

ठाणे जिल्हा गणित अध्यापक मंडळाने आयोजित केलेल्या गणित परीक्षा २००७ मध्ये इ. ५वी तील विद्यार्थी कु. तेजस गोखले यास प्रमाणपत्र मिळाले.

२० जानेवारी २००७ रोजी चेन्नई येथे झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील तृतीय Abacus आणि अंकगणित स्पर्धेत कु. धवल शाखला यांस उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. त्या स्तरावर मुंबई आणि ठाण्यातून तो एकमेव प्रतिनिधी होता.

सन २००६-०७ मध्ये लोकसत्ता आयोजित 'गाथा ज्ञानाची' कात्रण स्पर्धेत आमच्या शाळेचा विद्यार्थी कु.

ओजस मुळे (इ. ५वी) याला विशेष उत्तेजन पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

**हिंदी राष्ट्र भाषा परीक्षा - १००% निकाल**

**परीक्षेचे नाव बालबोधिनी प्राथमिक प्रवेशिका प्रबोध**

| | | |
|---|---|---|
| परीक्षेला बसलेले विद्यार्थी | | ३ २० ८ १ |
| विशेष प्रावीण्य | एकूण विद्यार्थी | ० ७ ० ० |
| प्रथम श्रेणी | एकूण विद्यार्थी | ३ १२ ६ ० |
| द्वितीय श्रेणी | एकूण विद्यार्थी | ० १ २ १ |

**एलिमेंटरी व इंटरमिजिएट चित्रकला श्रेणी परीक्षा २००६-२००७**

**एलिमेंटरी श्रेणी परीक्षा एकूण विद्यार्थी - ४७**

| **उत्तीर्ण विद्यार्थी - ३९** | | |
|---|---|---|
| अ श्रेणी | - | ०२ |
| ब श्रेणी | - | ०२ |
| क श्रेणी | - | ३५ |

**इंटरमिजिएट श्रेणी परीक्षा एकूण विद्यार्थी - २२**

| **उत्तीर्ण विद्यार्थी - १५** |
|---|
| अ श्रेणी - ०२ |
| ब श्रेणी - ०३ |
| क श्रेणी -१० |

कु. ओजस गोहाड हिला 'टाईम्स ऑफ इंडिया' तर्फे 'स्टुडंट ऑफ द इयर' हा पुरस्कार मिळाला. रोख रक्कम रु. १०००/- तसेच प्रमाणपत्र आणि गौरव चिन्ह ही मिळाले.

**जोशी- बेडेकर महाविद्यालय**

६ फेब्रुवारी ते १० मार्च २००७ या कालावधीत

रोजी तृतीय वर्ष, वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी घेतले गेलेले 'Campus interviews' हा या कालावधीतील विशेष उपक्रम. खाजगी क्षेत्रात अग्रस्थानी असणारी एक कंपनी म्हणजे टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस या कंपनीतर्फे महाविद्यालयात 'Campus interview' घेऊन महाविद्यालयाने तृतीय वर्ष वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी बाहेरच्या जगाचे दालनच खुले करून दिले. १६० मुलांनी या मुलाखतीत भाग घेतला. त्यापैकी १८ मुलांची निवड कंपनी तर्फे करण्यात आली.

१३ फेब्रुवारी रोजी 'डॉन अ डे' तर्फे Campus interviews या बहुराष्ट्रीय कंपनीतर्फे तृतीय वर्ष वाणिज्य विद्यार्थ्यांसाठी 'Campus interview' घेण्यात आहे. ५२ विद्यार्थी यात सहभागी झाले व त्यातील १५ जणांची निवड करण्यात आली.

कँपस interviews ही खरे तर, अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयांची मक्तेदारी. परंतु ही मक्तेदारी मोडून काढत महाविद्यालयाने एक नवीन पायंडा पाडला.

**१० फेब्रुवारी रोजी विद्यार्थी मंडळाचा सत्कार**

महाविद्यालयात होणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमात उपक्रमात विद्यार्थ्यांच्या सहभागाबरोबरच विद्यार्थी मंडळाचा सहभाग असल्यामुळे १० फेब्रुवारी २००७ रोजी विद्यार्थी मंडळातील प्रत्येकाला स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

१५ फेब्रुवारी ही लेक्चर्स घेण्याची अखेरची तारीख. त्यानंतर सर्वच विद्यार्थी मार्चमध्ये होणाऱ्या परीक्षेच्या अभ्यासासाठी सरसावले.

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

- पदवी व ज्युनियर असे दोन्ही मिळून ६० विद्यार्थी राज्य स्तरीय व आंतरमहाविद्यालयीन खेळांच्या स्पर्धेत सहभागी झाले होते.

महावद्यिलयाने आंतरमहाविद्यालयीन बुद्दिबळ स्पर्धेत ठाणे जिल्ह्यातील तिसऱ्या झोनमध्ये दुसरे स्थान पटकावले.

- विज्ञान शाखेच्या दुसऱ्या वर्षात शिकत असणाऱ्या कु. संजय वसंत वाडेकर याची नॅशनल वॉटरपोलो कोचिंग कॅम्पमध्ये निवड झाली.



ॲन्युल स्पोटर्स



ॲन्युल स्पोटर्स

- २० डिसेंबर २००६ रोजी ॲन्युलय स्पोर्टस महाविद्यालयाच्या पटांगणाता आयोजित करण्यात आले होते. जनरल चॅम्पिनशिप पदवी महाविद्यालयातून मुलांमध्ये अकरावीत शिकत असलेल्या, कु. नितीन फड याला आणि मुलींमध्ये अकरावीत शिकत असलेल्या कु. स्नेलह कुटे हिला देण्यात आली.

- अकरावीत शिकत असलेल्या राजकिरण सुरेश मार्णे याचा राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत प्रथम क्रमांक, ज्युडोमध्ये दुसरा क्रमांक आणि टेकवॉंदोमध्ये प्रथम क्रमांक पटकावला.

- साहित्य सहवासतर्फे २८ नोव्हेंबर २००६ ला प्रसारमध्ये बेजबाबदार आहेत? का या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला मुलांचा प्रतिसाद चांगला होता.

साहित्य सहवासतर्फे दुसरा कार्यक्रम पिढीतील अंतर १६ डिसेंबर २००६ रोजी दुपारी ३.०० वाजता खुल्या स्टेजवर आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर, उपप्राचार्या श्रीमती अकोलकर मॅडम, ज्युनियर कॉलेजचे उपप्राचार्य श्री. कुलकर्णी सर, श्री. माळी सर आदी शिक्षक कर्मचारी तर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांपैकी श्री. शरद ललित, श्री. सी. एन्. कर्णिक उपस्थित होते. या कार्यक्रमाला विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**प्रा. प्रकाश संतोष माळी**

- महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागाच्या प्रा. प्रकाश संतोष माळी यांना इंडियन आर्ट कल्चर ॲन्ड

टॅलेन्ट डेव्हलपमेंट सेंटरच्या वतीने राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच त्यांना न्यायिक लढा पत्रकार सेवा संस्था ठाणे यांच्यावतीने प्रदान करण्यात आले.

- महाविद्यालयाच्या वार्षिक संमेलनाची ''आकांक्षा'' ची सुरुवात २० डिसेंबरला मेहेंदी स्पर्धा, नववधू श्रृंगार व केशभूषा स्पर्धेने झाली. यावर्षी प्रथमच मुलंदेखील केशभूषा स्पर्धेत सहभागी झाली होती.
- दुसऱ्या दिवशी फुलांची सजावट, सॅलॅड मेकिंग व रांगोळी अशा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. कु मनस्वी गोंधळी हिला मिस बांदोडकर व कु. सौरभ शाह याला मिस्टर बांदोडकर यांचे मुकुट मिळाले.
- २२ डिसेंबरला इन्स्ट्रूमेंटल, अंताक्षरी, सिंगिंग, ग्रुप डान्स व फॅशन शो आयोजित आदी कार्यक्रम करण्यात आले होते.
- एम. सी. सी.कॉलेज आयोजित आंतर महाविद्यालयीन व्यक्तिमत्व स्पर्धेत कु. गणेश जेजुरकर याचा मुलांमध्ये प्रथम तर कु. श्वेतलाना कौरे हिचा मुलींमध्ये दुसरा क्रमांक आला.
- माहिती तंत्रज्ञान विभागाच्या कु. विनती म्हात्रे हिला मोनोॲक्टींगमध्ये भरपूर प्रशस्तीपत्रे व ट्रॉफी मिळाल्या.
- वांद्रा येथे महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेतर्फे आयोजित बॉल डान्समध्ये प्राची आंबावणे हिचा दुसरा क्रमांक आला.
- ग्रंथपाल कु. कांदबंरी करदेकर यांनी भांडुपच्या व्ही. के. कृष्णा मेनन कॉलेज ऑफ कॉमर्स इकोनॉमिक्स ॲन्ड सायन्स, यांनी आयोजित केलेल्या ''Achieving Excellence in Higher Education through Library as Learning Resource Centre''या दोन दिवसीय **राज्यस्तरीय** परिषदे मध्ये ''Best Practices in Library Services'' या विषयावर निबंध सादर केला. महाविद्यालयाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाच्या ग्रंथपाल कु. शीतल हातेकर देखील या परिषदेस उपस्थित होत्या.

## वि. प्र. मं. तंत्रनिकेन

### विद्युत अभियांत्रिकी विभाग

वीज बिलाचे दरपत्रक व त्याची मांडणी या विषयावर मार्गदर्शन

वीज बिलाचे दरपत्रक व त्याची मांडणी या विषयावर श्री. श्रीराम देशपांडे ( डेप्युटी एक्झिक्युटीव्ह, महावितर) यांनी द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वीज बिलातील विविध अधिभार व बिलातील त्यांची मांडणी यावरही त्यांनी प्रकाश टाकला. हा कार्यक्रम दि. २५ आनेवारी २००७ रोजो आयोजित करण्यात आला होता.



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना **श्री. श्रीराम देशपांडे**

## निरोप समारंभ




**निरोप समारंभ प्रसंगी व्यासपीठावर उपस्थित असलेले मान्यवर - डावीकडून प्राचार्य नायकसर, प्रा. भाकरेसर, प्रा. ए. एस. अंधारे, माजी प्राचार्य एस. एस. मुजुमदार**

वि. प्र. मंडळच्या तंत्रनिकेतनमधील तृतीय वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांकरिता निरोप समारंभाचे आयोजन २८ मार्च २००७ रोजी ३.०० ते ५.३० वाजता थोरले बाजीराव पेशवे सभागृह कॉलेज कॅम्पस, ठाणे येथे पार पडला. या कार्यक्रमा प्रसंगी प्राचार्य दि. कृ. नायक, प्रा. व्ही. एस. भाकरे, प्रा. ए. एस. अंधारे व माजी प्राचार्य एस. एस. मुजुमदार इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व तृतीय वर्षातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रा. सौ. उषा राघवन यांनी उपस्थित असलेल्या मान्यवरांचे स्वागत केले. याप्रसंगी अनेक शिक्षकांनी आपली मनोगते व्यक्त केली. त्यामध्ये डॉ. सौ. आर. के. जांबोटकर, प्रा. सौ. उषा राघवन, प्रा. सौ. एन. व्ही. वडेर, प्रा. टी. व्ही. मोहिते-पाटील, प्रा. सौ. शुक्ल मॅडम, प्रा. सौ. अगाशे मॅडम, प्रा. सौ. व्ही. ए. जोशी, प्रा. सौ. जपे मॅडम, प्रा. वालवलकर सर इत्यादी यांचा समावेश होता.

मान्यवरांमध्ये प्रा. व्ही. एस. भाकरे यांनी



**निरोप समारंभ प्रसंगी उपस्थित असलेले शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी समूह**

Importance of Soft Skills विषयी विचार मांडले. माजी प्राचार्य मुजुमदार सरांनी डिप्लोमानंतर संधी विषयी माहिती विद्यार्थ्यांना करून दिली. तसेच समर्पक उत्तरे लिहिण्याची सूचनाही केली. वि. प्र. मंडळाचे प्राचार्य दि. कृ. नायक यांनीही आपले विचार मांडले. प्रा. ए. एस. अंधारे यांनीही विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले सर्वच मान्यवरांनी विद्यार्थ्यांसाठी भावी वाटचालींविषयी हार्दिक शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी ही आपली मनोगते प्रकट केली.

शेवटी आभार प्रदर्शन प्रा. टी. व्ही. मोहिते-पाटील यांनी केले.

## ADCSSAA व Industrial Safety कोर्सच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभासाचे आयोजन

IT centre तर्फे व MSBTE मान्यताप्राप्त ADCSSAA (Advanced Diploma in Computer Software System Analysis and Applications) व Industrial Safety कोर्स या एक वर्ष कालावधी असलेल्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचे आयोजन १५ मार्च २००७ रोजी करण्यात आले होते. सायंकाळी ६.०० वाजता वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन





डावीकडून - श्री. पी. बी. शिरसाठे, श्री. एन. के. जॉईश, श्री. ए. जे. दिवाडकर, श्री. दि. कृ. नायक, श्री. व्ही. एस. भाकरे, श्री. सी. ए. कोटीयान

मधील दृकश्राव्य कक्षा मध्ये निरोप समारंभाच्या कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमासाठी वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक, प्रा. व्ही. एस. भाकरे, श्री. एन. के. जॉयीश, श्री. पी. बी. शिरसाठे, श्री. ए. जे. दिवाडकर श्री. सी. ए. कोटीयन इत्यादी मान्यवर उपस्थित होते. तसेच ADCSSAA व Industrial Safety या दोन्ही कोर्सचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रा. सौ. स्मिता खंडागळे यांनी पुष्पगुच्छ देऊन उपस्थितांचे मान्यवरांचे स्वागत केले. प्राचार्य दि. कृ. नायक व प्रा. व्ही. एस. भाकरे यांनी आपले मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांच्या भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या. इतर मान्यवरांनी आपले विचार मांडले. विद्यार्थी डी. यी. कांबळे यांनी कंपनीमध्ये Safety ची किती आवश्यकता आहे हे उदाहरणासह सांगितले.

शेवटी रुपाली देशपांडे यांनी आभार प्रदर्शन केले.

## वि. प्र. मं. ठाणे महापालिका विधी महाविद्यालय, ठाणे

### वार्षिक स्नेहसंमेलन

१७ मार्च २००७ रोजी व्हि. पी. एम. च्या मैदानावर रंगलेली संध्याकाळ - ती म्हणजे व्हि. पी. एम. टि. एम. सी च्या विधी महाविद्यालयाचे वार्षिक स्नेह संम्मेलन दुपार पासूनच महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थीनींचा उत्साह ओसंडून जात असताना दिसत होता. स्नेह संमेलनास करमणूकीचे विविध कार्यक्रम व वाद्यवृंद आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाची रंगत आणखीनच वाढण्याचे कारण म्हणजे या कार्यक्रमात आमचा काही शिक्षक वर्ग व काही शिक्षकेतर कर्मचारी यांनी मिळून एक अतिशय छान गाणे सादर केले व त्याने समारंभाची शोभा आणखीन वाढली.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. एच. एस. घारे निवृत्त (सीटी सिव्हिल कोर्ट व अतिरिक्त सत्र) न्यायाधिश मुंबई हे लाभले तसेच इतर मान्यवरांमध्ये श्री. गजानन चव्हाण ठाणे जिल्हा वकिल संघटना न्यायालय बार असोशियनचे अध्यक्ष, ह्या कार्यक्रमात आपल्या मंडळाचे सिनियर कमिटी मेंबर श्री. एस. व्हि. करंदीकर हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे श्री. घारे ह्यांच्या हस्ते विविध शैक्षणिक, क्रिडा व इतर अनेक स्पर्धांची पारितोषिके देण्यात आली. महत्त्वाचे म्हणजे अनेक वर्षांच्या कालावधीनंतर विधी महाविद्यालयाचे मासिक प्रकाशित करण्यात आले.

कार्यक्रमात श्री. घारे व श्री. चव्हाण ह्यांनी विद्यार्थ्यांना विधी शाखेत कायदेविषयक क्षेत्रात खूप वेगवेगळ्या संधी उपलब्ध झाल्या आहेत ह्याची माहिती दिली. अतिशय उल्लेखनीय बाब अशी की श्री. घारे यांनी समारंभाच्या दिवशी विधी महाविद्यालयासाठी एक अतिशय उपयुक्त पुस्तक भेट दिले. ते म्हणजे 'Indomintable Spirit' हे पुस्तक भारताचे राष्ट्रपती श्री. अब्दुल कलाम ह्यांनी लिहिलेले आहे व ते पुस्तक असे आहे ते जरूर साखर पडल्यासारखे झाले.

असे हे वार्षिक स्नेह संम्मेलन खरोखर करमणूक, शैक्षणिक व विविध गोष्टींमुळे नटलेले झाले.

दिशा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

(पान क्रमांक ३२ वरून)

माहिती साक्षरता क्षमता मानकाचे मराठीत भाषांतर केले आहे. सर्व भारतीय भाषांपैकी केवळ मराठीलाच हा ज्ञान मिळाला आहे. हेही या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे.

ग्रंथाची भाषा ओघवती आहे. सरळ सोपे शब्द, आवश्यक तेथे इंग्रजी प्रतिशब्द, अनेक उदाहरणे, छायाचित्रे, आकृत्या यामुळे विषय समजण्यास मदत झाली आहे. संगणकीकरण व आधुनिकीकरणातील संभाव्य अडचणींचा विचार करून त्यावर ही चर्चा करण्यात आली आहे. त्यामुळे ग्रंथाला आणखी एक परिमाण लाभले आहे.

'नॅक' च्या निकषांनुसार ग्रंथालय संगणकीकरण अनिवार्य आहे. त्यामुळे विद्यमान ग्रंथपालांना नॅकला सामोरे जाताना हा ग्रंथ अतिशय उपयुक्त आहे. शिवाय या ग्रंथात अगदी बारीकसारीक मुद्यांवरही विवेचन केले असल्याने नेट/सेट परीक्षा, तसेच एम.फिलचा बहुतांश अभ्यासक्रम यात समाविष्ट असल्याने संभाव्य ग्रंथपालांचा हा ग्रंथ तर मार्गदर्शक मित्रच आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने तर एम. फिल साठी संदर्भ ग्रंथ म्हणून या ग्रंथास मान्यता दिली आहे. पीएच. डी. करणाऱ्यांसाठीसुद्धा हा ग्रंथ पायाभूत आधार ठरू शकतो.

ग्रंथालयातील दैनंदिन कामकाज, सेवा, व्यवस्थापन इत्यादी सर्वच अंगांचा संगणकीकरणाच्या दृष्टिकोनातून विचार केला असल्याने हा ग्रंथ ग्रंथालयात असणे, गरजेचे झाले आहे. कोणत्याही टप्पावर कोणत्याही माहितीसाठी हा योग्य माहिती पुरवीत असल्यामुळे त्यास संदर्भ ग्रंथाचेच मूल्य प्राप्त झाले आहे. सुंदर व सुबक छपाई, शुद्ध मुद्रण, आकर्षक मुखपृष्ठ, उत्तम सजावट ही या ग्रंथाची अन्य वैशिष्ट्ये आहेत. ४१६ पृष्ठांच्या या ग्रंथ अवघ्या २५० रूपयांत युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे यांनी उपलब्ध करून दिला आहे.

श्रीनिवास आठल्ये

डोंबिवली